## अहिल्यानगरमध्ये कार-ट्रक अपघातात पाच जण ठार



**अहिल्यानगर :** जिह्यात धक्कादायक घटना घडली आहे. जिल्ह्यातील श्रीरामपूर संगमनेर रस्त्यावर भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा गावाजवळ कार आणि मालवाहू ट्रकचा अपघात झाला आहे. कारमधील पाच प्रवाशांचा जागीच मृत्यू तर दोनजण गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. मृतांमध्ये दोन महिला, एक पुरुष आणि दोन लहान बालकांचा समावेश आहे. या भीषण अपघातात श्रीरामपूर येथील एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाला आहे. श्रीगोंदा तालुक्यातील घारगाव - कोळगाव रोडवरील माऊली मंदिरा जवळ भीषण अपघात झाला होता. ट्रक आणि इको कारची समोरा-समोर धडक झाल्याने चार जणांचा जागीच मृत्यू झाला होता.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २२०
www.ramprahar.com

◆ गुरुवार, २६ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


बलात्कारप्रकरणी आरोपीला १४ वर्षांचा सश्रम कारावास/२

अमली पदार्थ विक्रीसाठी आणणाऱ्या दोघांना अटक/३

हवामानातील बदलामुळे आंबा, काजू मोहरावर कीड/७


### वायू प्रदूषणाबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांचा तारांकित प्रश्न

# संबंधितांवर कारवाई -पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**




**उपाययोजनांची अंमलबजावणी सुरू**

सर्वकष मार्गदर्शक तत्वांच्या सूचनांच्या अनुषंगाने नियमांचे पालन न करणाऱ्या बांधकाम प्रकल्पांना लेखी सूचना दिल्यानंतर 'कारणे दाखवा नोटीस' व 'काम थांबवण्याची नोटीस' देण्यात येत आहे. १ ऑक्टोबर २०२५ ते ३१ जानेवारी २०२६ पर्यंत १९८१ बांधकामांना कारणे दाखवा नोटीस तसेच १०४७ ठिकाणी 'काम थांबवण्याची नोटीस' देण्यात आली असून कार्यवाही सुरू आहे. प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांची अंमलबजावणी सुरू आहे.

राज्यातील शहरांमधील वायू प्रदूषणाबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून या प्रश्नाद्वारे योग्य ती उपाययोजना करण्यासाठी शासनाचे लक्ष वेधले.

नवी मुंबई, मुंबई, नागपूर जळगाव व वसई विरार या शहरांमध्ये वायू प्रदूषण वाढल्याची व हवेचा गुणवत्ता निर्देशांक धोकादायक पातळीवर पोहोचल्याची बाब जानेवारी २०२६ मध्ये निदर्शनास आल्याचे खरे आहे का, असा सवाल आमदार प्रशांत ठाकूर यांनी या प्रश्नातून विचारला. हवेची गुणवत्ता ० ते ५० दरम्यान चांगली मानली जात असताना ३०० पेक्षा अधिक AQI अत्यंत धोकादायक श्रेणीत येत असल्यामुळे तसेच मोठ्या प्रमाणावरील सुरू असलेली बांधकामे, वाहनांची वाढती वर्दळ, रस्त्यांवरील धूळ, कचरा जाळणे, बेकऱ्या व औद्योगिक परिसरातून होणारे उत्सर्जन यामुळे प्रदूषण वाढ होऊन संबंधित शहरांतील नागरिकांच्या आरोग्यास, विशेषतः लहान मुले, वृद्ध व श्वसनविकारग्रस्त नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम झाला आहे.

मुंबई शहरात गेल्या वर्षभरात एक हजार कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या १२५ पेक्षा जास्त बांधकाम प्रकल्पांना परवानगी देण्यात आली असून, त्यापैकी अनेक प्रकल्पांमध्ये वायू प्रदूषण नियंत्रणाच्या नियमांचे उल्लंघन झाले आहे, तसेच, मुंबईत माहे नोव्हेंबर/डिसेंबर, २०२५ दरम्यान मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सुमोटो याचिका दाखल करून घेतली असता महापालिका प्रशासनाने मा. न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात ६७.८६ टन धुळ यंत्राच्या सहाय्याने झाडणे, काम सुरु असलेल्या १९५४ साईट्स पैकी १०२० साईट्सवर लो-कॉस्ट सेन्सर बसविले असून ३९७ सेन्सर बसविण्याचे काम सुरू असल्याचे १५ डिसेंबर २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, मुंबई महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडे बांधकाम धूळ नियंत्रणासाठी परिपत्रक जारी केले असले तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी, सेन्सर अनुपालन, खर्च, नोटिसा, दंड अथवा कारवाईबाबत कोणतीही नोंद उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, तसे असल्यास, सदरहू वायू प्रदूषण रोखण्याकरिता बांधकाम स्थळांवर धूळ नियंत्रणासाठी फवारणी, रस्त्यांची नियमित स्वच्छता, प्रदूषणकारी वाहनांवर कारवाई व हरित क्षेत्र वाढविण्याकरिता कार्यवाही करण्यासह बांधकाम प्रकल्पांची पाहणी करुन प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केला होता.

या प्रश्नावर पर्यावरण व वातावरणीय बदलमंत्री पंकजा मुंडे यांनी दिलेल्या उत्तरात सांगितले की, नवी मुंबई, मुंबई, नागपूर जळगाव व वसई विरार या शहरांमध्ये वायू प्रदूषण वाढल्याची व हवेचा गुणवत्ता निर्देशांक धोकादायक पातळीवर पोहचल्याची बाब खरी नाही. सतत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी केंद्रातील मासिक अहवालानुसार हवा गुणवत्ता निर्देशांक प्रामुख्याने समाधानकारक (AQI ५१-१००) ते मध्यम (AQI १०१-२००) श्रेणीत नोंदविला गेला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिका, आरोग्य विभाग यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार शहरांतील नागरिकांच्या आरोग्यास, विशेषतः लहान मुले, वृद्ध व श्वसनविकारग्रस्त नागरिकांच्या आरोग्यावर कोणताही परिणाम झालेला नाही दिसून येत नाही. बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानूसार नियमांचे पालन न करणाऱ्या बांधकाम प्रकल्पांना प्रारंभी लेखी सूचना बार (Intimation) दिल्यानंतर, कारणे दाखवा नोटीस आणि काम थांबवण्याची नोटीस देण्यात येत आहे. मुंबईत नोव्हेंबर/डिसेंबर, २०२५ दरम्यान मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सुमोटो याचिका दाखल करुन घेतली असता महापालिका प्रशासनाने मा. न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात ६७.८६ टन धुळ यंत्राच्या सहाय्याने झाडणे, काम सुरु असलेल्या १९५४ साईट्स पैकी १०२० साईट्सवर लो-कॉस्ट सेन्सर बसविले असून ३९७ सेन्सर बसविण्याचे काम सुरू असल्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०२५ रोजी निदर्शनास आले असून मुंबई महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडे बांधकाम धूळ नियंत्रणासाठी परिपत्रक जारी केले असले तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी, सेन्सर अनुपालन, खर्च, नोटिसा, दंड अथवा कारवाईबाबत कोणतीही नोंद उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनास आल्याचे खरे आहे. **(पान २ वर..)**

## मुलांचे 'डिजिटल व्यसन' सुटणार

### राज्य सरकारकडून तज्ज्ञांचा टास्क फोर्स नियुक्त -मंत्री आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**



मुलांमध्ये वाढत चाललेल्या डिजिटल व्यसनाबाबत आणि त्याचा होणारा दुष्परिणाम लक्षात घेता याबाबत अभ्यास तसेच उपाययोजना सूचवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक तज्ज्ञांचा टास्क फोर्स नियुक्त केला असून पुढील अधिवेशनाच्या आत याबाबतचा अहवाल सादर करू, अशी माहिती राज्याचे माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी बुधवारी (दि.२५) विधान परिषदेत दिली.

विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे, संजय केणेकर यांनी यांनी लक्षवेधी उपस्थितीत करून मुलांमध्ये वाढलेले डिजिटल व्यसन व त्याचे दुष्परिणाम याकडे सरकारचे लक्ष वेधले होते. या चर्चेत आमदार प्रवीण दरेकर, चित्रा वाघ, भाई जगताप, उमा खापरे आदी आमदार सहभागी झाले होते. या लक्षवेधीमध्ये तरुण आणि अल्पवयीन मुलांमध्ये सोशल मीडिया व्यसनाचे वाढते धोके अधोरेखित करण्यात आले होते. गेमिंग अँप व मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर वयोमर्यादा ठरविणे तसेच अल्पवयीनांना उद्देशून असलेल्या डिजिटल जाहिरातींवर निर्बंध आणण्याची शिफारस करण्यात येणार काय याबाबत प्रश्न यावेळी लक्षवेधीमध्ये उपस्थितत करण्यात आले होते.

या लक्षवेधीवर उत्तर देताना, मंत्री शेलार यांनी सांगितले की, राज्यासाठी या विषयाचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांचा कार्यदल स्थापन करण्यात येणार असून या कार्यदलामध्ये शिक्षणतज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ, बालसमुपदेशक, तंत्रज्ञान तज्ज्ञ, व्यवस्थापन तज्ज्ञ, डॉक्टर, कायदेतज्ज्ञ तसेच संबंधित शासकीय विभागांचे अधिकारी यांचा समावेश असणार आहे.

## राज्यात विशेष व्याघ्र संरक्षण दल सक्रीय-वनमंत्री गणेश नाईक

**मुंबई : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्यामध्ये २०२५ या एकाच वर्षात तब्बल ४१ वाघांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत लेखी उत्तराद्वारे सादर केली आहे.

या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर सरकारने रेल्वे आणि रस्ते अपघात रोखण्यासाठी वनक्षेत्रातील प्रस्तावित प्रकल्पांमध्ये वन्यप्राण्यांच्या सुरक्षित वावरासाठी अंडरपास व ओव्हरपास बांधण्याचे निर्देश दिले आहेत, तसेच रेल्वेचा वेग ताशी ४० किमीपर्यंत मर्यादित ठेवण्याच्या सूचनाही केल्या आहेत. शिकारीच्या संकटाचा सामना करण्यासाठी 'विशेष व्याघ्र संरक्षण दल' सक्रिय करण्यात आले असून, वनपरिक्षेत्र स्तरावर खबऱ्यांची जाळी, बिनतारी यंत्रणा आणि तपासणी नाक्यांद्वारे कडक पाळत ठेवली जात आहे. याशिवाय, वाघांच्या भ्रमणमार्गावर कॅमेरा ट्रॅप बसवणे, पंधरवड्यातून एकदा त्यांच्या अस्तित्वाचा मागोवा घेणे आणि पाणवठ्यांवरील विषप्रयोगासारख्या घटना रोखण्यासाठी नियमित गस्त घालणे अशा उपाययोजना राबविल्या जात आहेत, असे वनमंत्र्यांनी सांगितले.

### निवडक

**लष्करी हेलिकॉप्टर कोसळून चौघांचा मृत्यू**

**इराण :** अमेरिकेसोबत सुरू असलेल्या भीषण तणावाच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी इराणच्या मध्य भागात एक लष्करी हेलिकॉप्टर कोसळल्याची घटना घडली. मध्य इराणमधील फळ आणि भाजीपाला बाजारात हे हेलिकॉप्टर कोसळले असून या दुर्घटनेत किमान चार जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. इराणी राज्य दूरदर्शननुसार हा अपघात इराणची राजधानी तेहरानपासून सुमारे ३३० किलोमीटर दक्षिणेस असलेल्या इस्फहान प्रांतातील दोर्चेह शहरात झाला.

**नाशिक शहरात उद्यापासून चौथे विश्व मराठी संमेलन**

**नाशिक :** येथे २७ व २८ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत मराठा विद्याप्रसारक समाजाच्या केटीएचएम महाविद्यालयाच्या प्रांगणात चौथे विश्व मराठी संमेलन होत आहे. या पार्श्वभूमीवर मराठी भाषा विभागाने देश- विदेशातून येणाऱ्या मराठी भाषिक प्रेमींना नाव नोंदणीसाठी ऑनलाईन लिंक https://vishwamarathisammelan.com उपलब्ध करून दिली आहे.

## मुंबई महापालिकेचा ८० हजार ९५२ कोटींचा अर्थसंकल्प सादर



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिकेचा २०२६-२७ या आर्थिक वर्षांचा तब्बल ८० हजार ९५२ कोटींचा अर्थसंकल्प पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी स्थायी समितीला सादर केला. चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पापेक्षा या अर्थसंकल्पाचे आकारमान तब्बल ८.७७ टक्क्यापेक्षाही जास्त आहे. ही वाढ गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी आहे. प्रकल्पांचे खर्च भागवण्यासाठी येत्या वर्षात आणखी १३, ७६५ कोटी राखीव निधीतून काढण्यात येणार आहेत.

महापालिका मुख्यालयात प्रारंभी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अविनाश ढाकणे यांनी शिक्षण खात्याचे अर्थसंकल्पीय अंदाज नवनियुक्त शिक्षण समिती अध्यक्ष राजेश्री शिरवडकर यांना सादर केले.

मुंबई महापालिकेचा चालू वर्षाचा अर्थसंकल्प ७४,४२७ हजार कोटीचा सादर करण्यात आला होता. यंदाच्या अर्थसंकल्पातही ८.७७ टक्के वाढ झाली आहे. चालू आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज ६७,५१५ कोटी असे सुधारित करण्यात आले आहे. त्यामुळे चालू आर्थिक वर्षात निधी खर्च झाला नाही. मात्र तरीही येत्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाच्या आकारमानातही मोठी वाढ झाली आहे.

## प्रस्तावित पुणे-नाशिक रेल्वे मार्ग बदलणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**



बहुप्रतिक्षित पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाबाबत मोठी तांत्रिक अडचण निर्माण झाली असून, आता या रेल्वेचा मार्ग बदलावा लागणार आहे. केंद्र सरकारच्या बफर झोनच्या आक्षेपामुळे सध्या हा प्रकल्प रखडला असून, पर्यायी मार्गासाठी तज्ज्ञांची समिती नेमली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधान परिषदेत दिली.

पुणे-नाशिक रेल्वे मार्ग ज्या भागातून प्रस्तावित आहे, तिथे ३२ देशांच्या सहभागाची एक महत्त्वाची खगोलशास्त्रीय 'ऑब्झर्व्हेटरी' (GMRT) आहे. या ऑब्झर्व्हेटरीचा विशिष्ट बफर झोन असून, तिथून रेल्वे नेल्यास तांत्रिक अडथळे येऊ शकतात, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. मुख्यमंत्र्यांनी स्वतः दिल्लीत जाऊन सादरीकरण केले, तरीही बफर झोनचा मुद्दा महत्त्वाचा असल्याने जुन्या मार्गाला परवानगी नाकारण्यात आली आहे. या तांत्रिक पेचातून मार्ग काढण्यासाठी राज्य सरकार आता केंद्र सरकारशी चर्चा करून अत्यंत अनुभवी तांत्रिक कन्सल्टंटची नियुक्ती करणार आहे. ही समिती पुढील तीन ते चार महिने ऑब्झर्व्हेटरीच्या परिसराचा सखोल अभ्यास करेल.

## राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात तीन टक्के वाढ


**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात तीन टक्के वाढ करण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अधिकृत घोषणा वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधान परिषदेत एका विधायक निवेदनाद्वारे केली. मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील लाखो कर्मचाऱ्यांच्या हिताचा विचार करून हा सकारात्मक निर्णय घेतला असून, यामुळे आता राज्याचा महागाई भत्ता ५५ टक्क्यांवरून वाढून ५८ टक्के झाला आहे.

शासनाच्या या निर्णयानुसार, महागाई भत्त्यातील ही वाढ १ जुलै २०२५ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येणार आहे. कर्मचाऱ्यांना जुलै २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या चार महिन्यांच्या कालावधीतील थकबाकीची रक्कम मार्च २०२६ च्या वेतनासोबत अदा केली जाईल. या नियोजित निर्णयामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक वर्षाच्या अखेरीस आर्थिक लाभ मिळेल.



## कोळ्यांची नाव बंदरावरी!



**मुरूड : होळीसाठी मासेमारी करून मुंबईहून परतताना कोळी बांधवांनी आनंद साजरा केला, तर या कोळी बांधवांची मुले बाबा येणार म्हणून बंदरावर वाट पाहत उभी होती.** (छाया : सुधीर नाझरे, वृत्त पान २ वर..)

## पनवेल मनपाची ६ मार्चला पहिली सर्वसाधारण सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची पहिली सर्वसाधारण सभा शुक्रवार, ६ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता महापालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेत विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा व निर्णय होणार आहेत.

सभेच्या विषयपत्रिकेनुसार, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलमानूसार स्थायी समितीची रचना करण्यात येणार असून, जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या प्रभागांच्या सार्वत्रिक निवडणुकीतून निवडून आलेल्या पालिका सदस्यांपैकी १६ सदस्यांची प्रमाणशीर प्रतिनिधित्वानुसार स्थायी समितीवर नियुक्ती करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानूसार महिला व बालकल्याण समितीची सदस्य संख्या निश्चित करून संबंधित नियमांनुसार सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. यासोबतच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ नुसार ७ नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्याचाही विषय सभेपुढे ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका सचिव नानासाहेब कामठे यांनी दिली आहे.

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ करणार ४२ ग्रंथांचे प्रकाशन

**मुंबई : प्रतिनिधी**




मराठी भाषा गौरव दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे यंदा ४२ मौलिक ग्रंथांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. हा प्रकाशन सोहळा नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक समाजाचे के.टी.एच.एम. महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आला आहे.

मंडळाच्या स्थापनेपासून 'पुस्तक प्रकाशन' हे मुख्य उद्दिष्ट ठेवून गंभीर, वैचारिक, संशोधनपर आणि मौलिक विषयांवरील ग्रंथनिर्मिती सातत्याने केली जात आहे. खाजगी प्रकाशकांकडून सहसा प्रकाशित न होणारे उच्च दर्जाचे संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित करण्याची जबाबदारी मंडळ पार पाडत आहे. आजवर मंडळाने ७३० हून अधिक ग्रंथ प्रकाशित केले असून दरवर्षी मराठी भाषा गौरव दिनी नव्या ग्रंथांचे प्रकाशन करण्याची परंपरा जपली आहे.

यंदाच्या ४२ ग्रंथांमध्ये विविध क्षेत्रांतील महत्त्वपूर्ण साहित्याचा समावेश आहे. वारकरी परंपरेतील संतश्रेष्ठ संत तुकाराम महाराज यांच्या 'तुकारामबावांच्या अभंगाची गाथा' या ग्रंथाचा समावेश विशेष उल्लेखनीय आहे. तसेच श्रीमती अंजली मालकर लिखित 'हिंदुस्थानी अभिजात संगीताचा इतिहास' (पूर्वार्ध व उत्तरार्ध) या दोन खंडांत तेराव्या शतकापासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या संगीत प्रवासाचा अभ्यासपूर्ण आढावा घेण्यात आला आहे.

मंडळाचे सर्व ग्रंथ https://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच शासकीय मुद्रणालय व खाजगी वितरकांकडेही अत्यल्प दरात हे ग्रंथ उपलब्ध आहेत. प्रतिसादामुळे अनेक ग्रंथांचे पुनर्मुद्रण करावे लागत असल्याचे मंडळाकडून सांगण्यात आले.

# एसटी कर्मचाऱ्यांचा वेतन वाढीचा थकीत हप्ता त्यांच्या बँक खात्यात जमा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या कानाकोपऱ्यात धावणाऱ्या 'लालपरी'ला आपल्या घामाने आणि कष्टाने जिवंत ठेवणाऱ्या सुमारे ८६ हजार एसटी कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर अखेर समाधानाची झळाळी उमटली आहे. वेतनवाढीचा थकीत हप्ता त्यांच्या बँक खात्यात जमा होताच, दिलेला शब्द पाळणाऱ्या परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा विश्वासाची मोहर उमटली.



एसटी महामंडळाकडे निधीअभावी थकीत वेतन देणे कठीण झाले असताना शासनाने तातडीने १०० कोटी रुपयांची तरतूद केली. परिणामी, फेब्रुवारी महिन्याच्या थकीत वेतनवाढीचा हप्ता कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा झाला. हा केवळ आर्थिक दिलासा नसून, तो शासनाच्या संवेदनशीलतेचा आणि बांधिलकीचा प्रत्यय आहे. असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

यापूर्वी ऑक्टोबर २०२५ मध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तत्कालीन उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्या सहमतीने कामगार संघटनांच्या बैठकीत दरमहा सुमारे ६५ कोटी रुपयांचे अनुदान देण्याचे घोषित केले होते. त्यानुसार डिसेंबरपासून थकीत हप्त्यांची प्रक्रिया सुरू झाली. मात्र काही तांत्रिक अडचणींमुळे फेब्रुवारीत निधीअभावी हप्ता देणे अशक्य झाले आणि कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीची लाट उसळली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून मंत्री सरनाईक यांनी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी सातत्याने चर्चा करत २१० कोटी रुपयांची मागणी केली. त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले आणि त्यापैकी १०० कोटी रुपयांचा निधी तत्काळ उपलब्ध झाला.

उर्वरित रक्कमही लवकरच प्राप्त होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. २४ फेब्रुवारी रोजी सर्व कर्मचाऱ्यांच्या खात्यात वेतनवाढीचा हप्ता जमा होताच, नाराजीचे ढग दूर झाले आणि विश्वासाचा सूर्य पुन्हा तेजाने उगवला. दिलेला शब्द पाळला, अशी भावना व्यक्त केली.

# मुरूड किनाऱ्यावर होळी सणासाठी सजलेल्या बोटी परतल्या

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

वातावरणातील बदलल्यामुळे चार महिन्यांपासून मासे फार अल्प प्रमाणात मिळत आहेत. त्यामुळे प्रमुख आर्थिक स्त्रोतावर गंभीर संकट असूनसुद्धा होळी सणात याचे कुठेही सावट दिसत नाही. होळी सण साजरा करण्यासाठी असंख्य बोटी किनाऱ्यावर येत आहेत. मुरुड परिसरात होळी सण मोठ्या उत्साहात साजरा होते.

होळीच्या ७ दिवस आधी मासेमारीसाठी गेलेल्या बोटी होळीसाठी परतात तेव्हा किनाऱ्यावर येण्याआधी आपली बोट समुद्रात असतानाच फुलांनी सजवतात, भगवे झेंडे, पिवळे झेंडे, बोटीवर डिझे स्पीकर लावून घरी परताना कोळी गाणी वाजवत, नाचत गुलाल उधळत मुरुड किनाऱ्यावर येतात. फटाके वाजवत येणाऱ्या बोटींना पाहण्यासाठी मुरुडकर एकदरा पुलावर गर्दी करतात. आपली सजलेली बोट जेटीवर येताना तिचे स्वागत घराचे लहान मुले, महिला पूजन करवून करतात हा आगळावेगळा सोहळा मुरुडच्या किनाऱ्यावर काल पासून सुरू झाला



कोकणातील किनारपट्टी भागात मासेमारी या प्रमुख व्यवसायावर समस्त कोळी बांधवांचे जीवन अवलंबून आहे. खोल समुद्रात मासळी पकडून ती मुंबई येथील ससून डॉक येथे विकून तो आपल्या कुटुंबाचे पोषण करतो. कोळी समाज हा भावनिक व श्रद्धाळूसुद्धा आहे. कोकणातील समस्त कोळी समाजाचा आवडता सण म्हणजे होळी. होळी सुरू होण्याअगोदर खोल समुद्रात सापडलेली मासळी मुंबईत विकून आनंदात होड्या आपल्या मायभूमीत येत असतात. सध्या असंख्य होड्या मुरुड तालुक्यातील नांदगाव, राजपुरी, एकदर, आगरदांडा, दिघी येथे येत असून, होळीसाठी मुंबईतून समस्त कोळी बांधव येत आहेत.मुंबईतून निघताना बोटी विविध रंगबिरंगी कापडाच्या झुलीने सजविल्या जातात. विविध फुले, विविध रंगाच्या पताका, रंगबिरंगी झेंडे व कोळी लोक पारंपरिक वेशभूषा परिधान करून प्रथम खंदेरी येथे वेताळ देवाचे दर्शन घेऊन येतात.

**कोळी बांधव होळी हा सण मोठ्या आनंदाने साजरा करीत असतात. आपल्या वर्षभरातील आपापसातील सर्व वैमनस्य विसरून गुण्यागोविंदाने हा सण साजरा करीत असतात. या होळीमध्ये तरु ण व वृद्ध स्त्री-पुरु ष सर्व उपक्र मांमध्ये आवर्जून सहभागी होतात. विशेष म्हणजे, इतर जातींपेक्षा कोळी समाजाचा होळी सण हा प्रकर्षाने साजरा केल्याचे जाणवते. सर्व दु:ख विसरून आनंद उधळणार हा सण म्हणून समस्त कोळी समाज होळी सणाची दरवर्षी आतुरतेने वाट पाहात असतो.**

**-प्रकाश सरपाटील ( कोळी बांधव )**

# कर्जत रेल्वे स्थानकाच्या बाहेर बसवले एटीएम

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वे स्थानकाच्या बाहेर एटीएम मशीन नव्हते. रेल्वे प्रवाशांना पैसे काढण्यासाठी बाजारपेठेत जावे लागत असे. एटीएम बसविण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी गेल्या तीन वर्षांपासून पाठपुरावा सुरु केला होता. त्याला यश आले असून कर्जत रेल्वे स्थानकाबाहेर एटीएम मशीन बसविण्यात आले आहे. लवकरच ते सुरु करण्यात येईल असे लेखी आश्वासन मध्य रेल्वे प्रशासनाने दिले आहे.

आजकाल बहुतेक प्रवासी ,खास करून युवा पिढी, सोबत रोख पैसे ठेवणे टाळतो कारण आज खूप ठिकाणी पैसे काढण्यासाठी एटीएम




मशीनची सुविधा असते. ती सुविधा कर्जत रेल्वे स्थानका बाहेर नसल्याने रेल्वे प्रवाशांची खूप गैरसोय होत होती. कर्जत रेल्वे स्थानकाच्या बाहेर मुख्य गेट जवळ एटीएम मशीन बसविण्यात यावे. यासाठी सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल गेल्या कित्येक वर्षापासून प्रयत्नशील होते.

काही महिन्यापूर्वी रेल्वेचे अधिकारी आणि खासदार श्रीरंग बारणे यांच्या सोबत कर्जत रेल्वे स्थानकात पाहणी करण्यासाठी आले असतानदेखील एटीएम मशीन बाबत चर्चा करण्यात आली होती. आता एटीएम मशीन बसविण्यात आले असून ते लवकरच सुरु होणार आहे.

**कर्जत रेल्वे स्थानकाबाहेर एटीएम मशीन उपलब्ध झाल्यामुळे कर्जतकरांना याचा खूप फायदा होणार आहे त्यामुळे याचा आपल्याला आनंद होत आहे. सदर एटीएम मशीन लवकरात लवकर सुरू होण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत.**

**-पंकज मांगीलाल ओसवाल, कर्जत**

# नवी मुंबई महापालिकेच्या कुऱ्हाडीपासून ४४० झाडे वाचवण्यासाठी रविवारी शांत मानवी साखळी

**नवी मुंबई : बातमीदार**

प्रस्तावित भूमिगत बोगद्याकरिता ४४० पूर्ण वाढ झालेल्या झाडांची तोड अथवा पुनर्लागवड करण्याच्या नवी मुंबई महानगरपालिका (एनएमएमसी) च्या योजनेविरोधात रविवार, १ मार्च २०२६ रोजी सानपाडा येथील पाम बीच रोडवर शांत मानवी साखळी उभारण्यात येणार आहे. रहिवासी, पर्यावरणप्रेमी आणि ज्येष्ठ नागरिक या आंदोलनात सहभागी होणार आहेत.

हा निषेध पाम बीच ग्रीन्स फोरमच्या वतीने आयोजित करण्यात आला असून नैटकनेक्ट फाउंडेशन आणि सानपाडा ज्येष्ठ नागरिक गट यांचा पाठिंबा आहे. हा कार्यक्रम रविवारी सकाळी ८.३० वाजता सेक्टर १९, सानपाडा येथील केसर सॉलिटेअर इमारतीसमोर सुरू होईल.



महानगरपालिकेच्या नोटिसांनुसार १११ झाडे तोडण्याचे आणि ३२९ झाडांचे पुनर्लागवड करण्याचे प्रस्तावित आहे. रहिवाशांचे म्हणणे आहे की ही दशकांपूर्वीची झाडे मुख्य मार्गालगत महत्त्वाचा हरित संरक्षक पट्टा तयार करतात. परिपक्व झाडांच्या पुनर्लागवडीचे यश प्रमाण अनेकदा ४० टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे त्यांनी नमूद केले.

पाम बीच ग्रीन्स फोरमचे संयोजक श्रीकांत पाटकी म्हणाले, आम्ही विकासाच्या विरोधात नाही. मात्र पायाभूत सुविधांचे नियोजन जबाबदारीने झाले पाहिजे. विद्यमान हरित आच्छादन नष्ट करण्यापूर्वी उड्डाणपूल किंवा एलिव्हेटेड रोड यांसारखे पर्याय तपासले पाहिजेत.

पाटकी आणि इतर रहिवाशांनी झाडांवर चिकटवलेल्या नोटिसांना उत्तर देत एनएमएमसीकडे औपचारिक हरकती सादर केल्या आहेत.नैटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार म्हणाले की शहरातील प्रति व्यक्ती वृक्षसंख्या सुमारे एक आहे, तर शहरी मानक तीन झाडांचे आहे. ते म्हणाले, स्वीकार्य पातळी गाठण्यासाठी आपल्याला वृक्षसंख्या तिपटीने वाढवावी लागेल. त्याऐवजी, दुर्दैवाने, वृक्षसंख्या वाढवण्याऐवजी महानगरपालिका ४४० परिपक्व झाडे तोडण्याचा विचार करत आहे. त्यांनी मुंबई महानगर प्रदेशात ३-३०-३०० शहरी वनीकरण सूत्राची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी केली - प्रत्येक घरातून तीन झाडे दिसावीत, प्रत्येक परिसरात ३० टक्के छत्र आच्छादन असावे आणि ३०० मीटर अंतरात हिरवळ उपलब्ध असावी.

पाम बीच ग्रीन्सचे सतीश निकम म्हणाले की श्वसनाचे आजार वाढत आहेत. आपण २१व्या शतकातील शहर उभारून ते आजारी शहर बनवायचे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.ते म्हणाले, विकास आणि पर्यावरण हे परस्परविरोधी नाहीत, आणि शहराने पायाभूत विकास व पर्यावरणीय जबाबदारी यांच्यात समतोल साधला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

# सुधागडच्या उन्हेरे फाट्यावर कलिंगड खरेदीसाठी झुंबड



**पाली : प्रतिनिधी**

जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात उन्हाची तप्त काहिली जाणवत आहे. अशातच भर उन्हात नागरिक पोटाला थंडावा म्हणून कलिंगडाचा आधार घेत आहेत. रायगड जिल्ह्यातील सुधागड (पाली) परिसरात कलिंगडाचा हंगाम सुरू झाला असून,सतत गजबजलेल्या उन्हेरे फाटा व स्थानिक बाजारपेठेत या फळाची विक्री जोरात सुरू झाली आहे.

पाली सुधागडात उन्हाच्या झळा अधिक तीव्र आहेत, त्यामुळे येथे कलिंगडाला मोठी मागणी दिसून येतेय. तसेच, सुधागड तालुक्यातील ओसाड आणि नापीक जमिनीवर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कलिंगडासारखे नंदनवन फुलवण्यात येत आहे. हे पीक साधारणपणे जानेवारी-फेब्रुवारीमध्ये लावले जाते. पाली खोपोली राज्यमहामार्गावर उन्हेरे फाटा येथे मोठ्या प्रमाणावर कलिंगडाची आवक सुरू असून ५० रुपयांपासून १५०, २०० अडीशे रुपयांपर्यंत आकारानुसार कलिंगड उपलब्ध आहेत. गोड, रसाळ व गरेयुक्त कलिंगड ग्राहकांच्या पसंतीस येतायत. दिवसेंदिवस तापमानाचा पारा चढत असल्याने कलिंगड खरेदी करण्यासाठी ग्राहकांची झुंबड पहावयास मिळतेय.

पण यावर्षी दरवर्षीच्या तुलनेत कलिंगडाचे दर जास्त आहेत. सध्या २० ते २५ हजार रुपये टन कलिंगड मिळत आहेत.

# मुरूड तालुका पत्रकार संघाचा सन्मान

**मुरूड : प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेतर्फे राज्य स्तरीय सन्मान सोहळा कर्जत येथील रॉयल गार्डन मंगल कार्यालयात आयोजित आदर्श जिल्हा, तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली खासदार श्रीरंग बारणे, स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते मुरुड तालुका पत्रकार संघाचा सन्मान करण्यात आला.

या वेळी परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, अध्यक्ष मिलिंद अष्टिवकर, खासदार श्रीरंग बारणे, कर्जत-खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुधाकर लाड, ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई तसेच न्यूज १८ मराठीचे संपादक मंदार फणसे, रायगड जिल्हा प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




मुरुड तालुका पत्रकार संघाने जंजिरा मुक्ती संग्राम दिनाची परंपरा तब्बल वीस वर्षे अखंडपणे जपत स्थानिक इतिहास जतन केला. ३१जानेवारी हा 'जंजिरा मुक्ती दिन' म्हणून सातत्याने साजरा केला जातो. शासनदरबारी अधिकृत मान्यता व ध्वजारोहणासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करून या चळवळीला व्यापक स्वरूप दिले.

मुरुड तालुका पत्रकार संघाच्या या कार्याची दखल घेत त्यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्याला रायगड जिल्हा प्रेस क्लब यांचेही सहकार्य लाभते. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेतर्फे हा मानाचा पुरस्कार मुरूड पत्रकार संघाचे अध्यक्ष सिराज शेख, उपाध्यक्ष सुधीर नाझरे, माजी अध्यक्ष प्रा . मेघराज जाधव, संजय करडे, अमुलकुमार जैन आणि रायगड प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष भारत रांजणकर यांनी स्वीकारला.

# वाशीमध्ये संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती आणि पालखी सोहळा राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत वाशी येथील शिवाजी महाराज चौकात रविवार २२ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बंजारा समाज नेते संजय राठोड, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, ऑल इंडिया बंजारा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शंकर पवार, नवी मुंबई बंजारा समाज सेवा संस्थेचे अध्यक्ष प्रभू चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी पोहरादेवीचे संत जितेंद्र महाराज यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली. नवी मुंबई बंजारा समाज सेवा संस्थेद्वारे कोपरखेरने हॉटेल ब्ल्यू डायमंडपासूनवाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत भव्य पालखी काढण्यात आली. या पालखी सोहळ्यात परंपरा व संस्कृतीचे दर्शन बंजारा समाजाने घडवले.



देशाच्या उत्कर्षामध्ये बंजारा समाजाचं अनन्यसाधारण महत्व आहे. एकेकाळी देशात व्यापार उद्दीमामध्ये वाहतूक करण्याचं काम बंजारा समाजाने केलेलं आहे. नवी मुंबईत या समाजाचा सन्मान झालेला आहे आणि भविष्यकाळात इथ बंजारा भवन निर्माण होण्यासाठी निश्चितच प्रयत्न केले जातील असे वनमंत्री गणेश नाईक यांनी आपल्या भाषणात सांगितले.

नवी मुंबई बंजारा समाज सेवा संस्थेचे अध्यक्ष प्रभू चव्हाण, सचिव वामन चव्हाण, खजिनदार श्रीचंद पवार , रवी राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या पालखी आणि जयंती सोहळ्यात मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

पान १ वरुन

## प्रदूषण करणाऱ्यांवर कारवाई -मंत्री पंकजा मुंडे

जानेवारी २०२६ पर्यत मुंबई शहरातील एकूण २२२४ बांधकामांपैकी १९५२ ठिकाणी लो-कॉस्ट सेन्सर बेस्ड संयंत्रे बसविण्यात आलेली आहे. दि.१६/०१/२०२६ रोजी ६७८ बांधकाम प्रकल्पांना सेन्सर अनुपालन नसल्यामुळे 'कामे थांबवा नोटीस' बजावण्यात आली आहे. ऑक्टोबर २०२५ ते जानेवारी २०२६ पर्यंत, २५ वॉर्डनिहाय भरारी पथकांमार्फत अनधिकृत डेब्रिज वाहतुकीवर प्रतिबंध, रुपये १,२१,२०० इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. रस्त्यावरील धूळ आटोक्यात आणण्यासाठी माहे ऑक्टोबर २०२५ ते दि.३०/०१/२०२६ पर्यंत सुमारे १४४०८ किलोमीटर लांबीचे रस्ते पाण्याने धुण्यात आले आहेत. तसेच रस्त्यावरील धूळ आटोक्यात आणण्यासाठी ५ हजार लीटर क्षमतेचे ७२ टँकर्स आणि नऊ हजार लीटर क्षमतेचे ५४ टैंकर्स दररोज वापरात येत असून प्रत्येक विभागामध्ये दिवसभर दोन पाळ्यांमध्ये एकूण २५ मिस्टींग मशीनचा वापर करण्यात येत आहे.

# मुरूडमधील वाहतूक समस्येवर तोडगा

**मुरुड** : शहरातील वाढत्या रहदारी समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आज मुरूड जंजिरा नगर परिषद कार्यालयात नगराध्यक्ष आराधना दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीस मुख्याधिकारी सचिन बच्छाव, पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे, नगरसेवक, तसेच व्यापारी प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील बाजारपेठ परिसर व मुख्य रस्त्यांवरील वाढती वाहतूक कोंडी, अनियमित पार्किंग, अतिक्रमण व एस.टी. बस वाहतुकीमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्य बाजारपेठेतील अतिक्रमण हटवणे, एस.टी.बस मार्गात आवश्यक ते बदल करण्या बाबत चर्चा झाली



# लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार; आरोपीला १४ वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा

**अलिबाग :-** लग्नाचे अमिश दाखवून महिलेवर बलात्कार करणाऱ्या पोलिसाला महागात पडले आहे. अलिबाग सत्र न्यायालयाने आरोपींला १४ वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. दिड लाखाहून अधिक रुपयांचा दंडही ठोठावला. नागेश पोपट गावडे असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.पोलीस कर्चच्याऱ्याला बलात्काराच्या गुन्ह्यात शिक्षा झाल्याने रायगड पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

सदर घटना ही २०१३ ते २०१५ या कालावधीत घडली होती. आरोपी आणि फिर्यादी हे दोघेही पोलीस दलात कार्यरत होते. यावेळी दोघांची ओळख झाली. आरोपी या गावडे यांनी लग्न झाल्याचे लपवून फिर्यादी महिलेशी जवळीक साधली. लग्नाचे आमिष दाखवून बळजबरीने शारिरीक संबध प्रस्तापित केले. पिडीत महिलेची नकळत चित्रफीत तयार करून तिला धमकावत जबरदस्ती करत शोषण केले.

या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात भादवी कलम ३७६, ३५४ अ,ब,क, ४२०, ४१७, ३२३, ५०६ सह माहीती व तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (अ) (ई), ६७ (अ) या कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास करून पोलीसांनी अलिबाग येथील जिल्हा व सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. या खटल्याची सुनावणी अलिबागच्या अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती एस आर तिवारी यांच्या न्यायालयात सुरू होती. यावेळी सराकरी अभियोक्ता म्हणून कोमल राठोड यांनी काम पाहीले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ग्राह्य धरला आणि आरोपी नागेश गावडे याला दोषी ठरवले. गावडे यास वरील भा. द. वि. सं. कलम ३७६ अन्वये १० वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा आणि १ लाख रुपयांचा दंड , तसेच भा. द. वि. सं. कलम ३७६ (२) (एन) अन्वये १४ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा आणि दीड लाख रुपयांचा दंड ठोठावला इतर कलमांअंतर्गतही शिक्षा सुनावली.

## निवडक

### कारची मोटरसायकलला धडक

**पनवेल :** पनवेल शहरातील नानासाहेब धर्माधिकारी ब्रिजवर पंचमुखी हनुमान मंदीर सिग्नल जवळ ब्रीज उतरत असताना एका कारचालकाने दुचाकीला दिलेल्या धडकेत ६७ वर्षीय ज्येष्ठ नागरिक जखमी झाले आहे. पनवेल शहरात राहणारे अतुल पाटणकर (वय ६७) हे आपल्या ताब्यातील स्कुटी (एमएच १२ एलसी ०५७२) ने मुळ गावी चिखले, ता. पनवेल येथे जात असताना ते नानासाहेब धर्माधिकारी ब्रीज उतरनीवर शिवशंभो सिग्नलच्या अलीकडे आले असता पाठीमागुन येणारी पांढऱ्या रंगाची हॉन्डाई कंपनिची आय १० गाडीने ठोकर मारून जखमी केले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मंगळसुत्र खेचुन दुकली पसार

**पनवेल :** मॉर्निंग वॉक करता जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील दोन लाख रुपये किमतीचे मंगळसुत्र खेचुन दुकली पसार झाल्याची घटना करंजाडे परिसरात घडली आहे. फिर्यादी छाया महाडकर व त्यांचे पती नामे नामदेव महाडकर हे मॉर्निंग वॉक करता जात असताना ॲक्सीस बँकेसमोरील सदाबहार नर्सरी जवळ, सेक्टर ०२ ए करंजाडे, पनवेल येथे आले असता एका मोटर सायकल वरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांच्या गळयातील २० ग्राम वजनाची २ लाख रुपये किमतीचे मंगळसुत्र त्यांना धक्का देवुन जबरीने खेचुन मोटर सायकल वरून पळुन गेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ड्रॉव्हरमधून रोख रक्कमेची चोरी

**पनवेल :** रिसेप्शन काऊंटरच्या ड्रॉव्हरमध्ये असलेले ५१ हजार रोख रक्कम चोरून नेल्याची घटना गांधी हॉस्पिटलमध्ये घडली आहे. रोहित भोसले याने गांधी हॉस्पिटलच्या रिसेप्शन काऊंटरच्या ड्रॉव्हरमध्ये असलेले ५१ हजार रोख रक्कम रुपये हे रिसेप्शनीस्ट शीतल तुपसमुद्रे किंवा हॉस्पिटलच्या इतर स्टाफच्या संमतीशिवाय चोरून नेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### आळी आंबिवलीत रस्त्याचे उद्घाटन

**रसायनी :** आळी आंबिवली नवीन वसाहत येथील रस्त्याचे उद्घाटन संदीप सुदाम मुंढे शेठ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अनेक उपस्थित होते. यावेळी केदार भोईर, प्रमोद रायकर, रुपेश जाधव, विजय शिंदे, प्रदीप माळी, शुक्लेश्वर दिघे, राजू राठोड, मोहन चव्हाण, अनिल चव्हाण, गणेश मोरे, पिंटू मोठे, सिताराम शाहू, सोमू राठोड, अयान शेख, शोकत अली शेख, इजाज खान, अनिता माळी, विजय चव्हाण, हेमंत चव्हाण आदी उपस्थित होते.



# अमली पदार्थ विक्रीसाठी आणणाऱ्या दोघांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्टेशन रोडवरील साईबाबा मंदिरासमोरील भगत चाळ परिसरात अमली पदार्थ विक्रीसाठी बाळगणाऱ्या दोन व्यक्तींना पनवेल शहर पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून एक लाख ६१ हजार रुपये किमतीची मुद्देमाल हस्तगत केला आहे.

आरोपी सागर जोसेफ (वय २५) आणि गणेश जोसेफ (वय २१) हे पनवेल रेल्वे स्टेशन रोडवरील साईबाबा मंदिरासमोरील भगत चाळ परिसरात अमली पदार्थ विक्रीसाठी बाळगत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाणे स.पो.नि. प्रविण फडतरे, पो.हवा. संदेश म्हात्रे, पो.हवा. अमोल पाटील, पो.ना. मिथुन भोसले, पो.शि. किरण कराड, पो.शि. सचिन कोर, पो. शि विशाल दुधे आदींच्या पथकाने त्यांना ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्यांच्याकडून एक लाख नऊ हजार ९०० रुपये किंमतीचा ४.३९६ किलो वजनाचा गांजा, रोख रक्कम आणि आयफोन मोबाईल, असा एकूण एक लाख ६१ हजार रुपये किमतीची मुद्देमाल हस्तगत केला आहे.



## पनवेल येथे मोफत कौशल्य प्रशिक्षण आणि नोकरी संधी केंद्रासाठी पुढाकार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शहरातील बेरोजगार युवक-युवतींना कौशल्याधारित मोफत प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने पनवेलमध्ये लवकरच मोफत प्रशिक्षण व नोकरी संधी केंद्र सुरू करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण हालचाली सुरू झाल्या आहेत. या उपक्रमासाठी नगरसेविका डॉ. अस्मिता जगदिश घरत यांनी पुढाकार घेत सक्रिय भूमिका बजावली आहे.



लाईटहाऊस संस्थाचे मुंबई विभाग क्लस्टर हेड निलेश पाटील आणि कार्यकर्ते आवळेसर यांनी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात मोफत प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याबाबत डॉ. अस्मिता घरत यांची भेट घेतली. या बैठकीत प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून युवक-युवतींना विविध रोजगाराभिमुख कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. संबंधित प्रकल्पाची सविस्तर माहिती सादर करण्यात आली.स्थानिक बेरोजगार तरुणांसाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मत व्यक्त करत डॉ. घरत यांनी तत्काळ पुढील कार्यवाही सुरू केली. त्याचदिवशी त्यांनी पनवेल महानगरपालिकाचे महापौर नितीन पाटील तसेच माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची भेट घेऊन प्रकल्पाबाबत सविस्तर चर्चा केली.

बैठकीदरम्यान प्रकल्पासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून काही मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. त्यानंतर डॉ. अस्मिता घरत यांनी महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेऊन प्रशिक्षण केंद्रासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा केली. आयुक्तांनीही या प्रस्तावाची दखल घेत शिक्षण विभागाला योग्य जागेची पाहणी करण्याबाबत निर्देश दिले आहेत. एका दिवसात सलग तीन महत्त्वपूर्ण बैठका घेऊन या प्रकल्पाला गती देण्याचा प्रयत्न डॉ. अस्मिता घरत यांनी केला आहे.

लवकरच या उपक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होऊन शहरातील बेरोजगार युवक-युवतींना मोफत कौशल्य प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास लाईटहाऊस संस्थेचे मुंबई विभाग क्लस्टर हेड निलेश पाटील आणि श्री. आवळेसर यांनी व्यक्त केला आहे. तसेच त्यांनी महापौर नितीन पाटील, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, आयुक्त मंगेश चितळे आणि पुढाकार घेणाऱ्या नगरसेविका डॉ. अस्मिता जगदिश घरत यांचे विशेष आभार मानले आहेत.

## रुग्णालयाच्या नावाने साडेसहा लाखांची ऑनलाईन फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

रुग्णालयाच्या नावाचा वापर करून ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक फसवणूक झाली. कर्नाटक येथील एका प्रसिद्ध आयुर्वेद रुग्णालयात उपचार घेण्यासाठी माहिती शोधत असताना कळंबोलीतील ज्येष्ठाने ऑनलाईन व्यवहारात तब्बल सहा लाख ४० हजार रुपये गमावले.

कळंबोली येथील सेक्टर १ मधील सोसायटीत राहणारे ६० वर्षीय ज्येष्ठ नागरिक उपचारांसाठी कर्नाटक राज्यातील नागरमोळी येथील एका रुग्णालयाची माहिती इंटरनेटवर शोधत होते. या वेळी अधिकृत रुग्णालयाच्या संकेतस्थळासारखे दिसणाऱ्या एका बनावट संकेतस्थळावरून त्यांचा संपर्क दोन संशयितशी झाला. संशयितांनी पीडित ज्येष्ठ नागरिकांच्या मोबाईलवर 'डॉट एपीके' स्वरूपाची फाइल पाठवून ती डाऊनलोड करण्यास भाग पाडले. त्या फाइलमधील लिंकद्वारे बँक खात्यातून सहा लाख ४० हजार रुपयांची रक्कम अन्य खात्यात वर्ग करण्यात आली.

नंतर पीडितांनी मूळ रुग्णालयाशी थेट संपर्क साधला असता, कोणतीही रक्कम प्राप्त झाली नसल्याचे स्पष्ट झाल्याने फसवणूक उघडकीस आली. त्यानंतर ज्येष्ठ नागरिकांनी कळंबोली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

## कामोठे येथे डांबरीकरणाच्या कामास सुरुवात

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील सेक्टर १८ आणि सेक्टर ३१ मधील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्यामुळे नागरिकांना गेल्या अनेक महिन्यांपासून त्रास सहन करावा लागत होता. या समस्येबाबत वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न प्रलंबित होता. नागरिकांच्या सातत्यपूर्ण मागणीची दखल घेत भारतीय जनता पक्ष, कामोठे मंडळाच्या माध्यमातून तसेच स्थानिक पातळीवरील प्रयत्नांमुळे संबंधित ठिकाणी डांबरीकरणाच्या कामास सुरुवात करण्यात आली.



यावेळी भाजप कामोठे मंडळाचे उपाध्यक्ष दामोदर चव्हाण आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. या कामामुळे लवकरच नागरिकांना खड्ड्यांच्या समस्येतून दिलासा मिळणार असून सुरक्षित व सुकर रस्ता उपलब्ध होणार आहे.

## डॉक्टरांनी घेतली महापौर नितीन पाटील यांची भेट



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनने पनवेल महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर नितीन पाटील ह्यांची सदिच्छा भेट घेतली. संघटनेचे अध्यक्ष डॉ.वैभव मोकल ह्यांनी संघटनेविषयी व संघटना करत असलेल्या विविध सामाजिक उपक्रमांविषयी माहिती दिली. ह्या व्यतिरिक्त वैद्यकीय व्यवसायात येणाऱ्या शासकीय शासकीय समस्यांविषयी अवगत केले. महापौरांनी त्याविषयी एक स्वतंत्र बैठक बोलवावी, असे सुचवले.

महापौरांनी उपस्थित सर्व डॉक्टरांचे आभार मानले व संघटनेच्या उपक्रमांना शुभेच्छा व सहकार्याचे आश्वासन दिले. या भेटीत डॉ.आशिष गांधी, डॉ.लक्ष्मण आवटे, डॉ. मिलिंद जोशी, डॉ.टिपणीस, डॉ.बहाडकर, डॉ.भावेश ठक्कर, डॉ.राजेश गांधी, डॉ.पटेल, डॉ. ओक, डॉ.आशिष भगत, डॉ. शेख, डॉ.सोमवंशी, डॉ.माळवी, डॉ.वसंत पाटील, डॉ.अमित दवे उपस्थित होते.

## कंत्राटदाराच्या निष्काळजीमुळे ज्येष्ठाने गमावला डोळा

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील एका नामवंत गृहनिर्माण सोसायटीत सुरू असलेल्या दुरुस्ती कामातील कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे एका ८८ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला आपला एक डोळा गमवावा लागल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात संबंधित कंत्राटदार कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर उपनगरातील सेक्टर ४ येथील रेलविहार गृहनिर्माण सोसायटीमध्ये इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरू होते. सोसायटीत राहणारे ८८ वर्षीय ज्येष्ठ नागरिक आपल्या घराजवळ असताना अचानक कामासाठी वापरण्यात येणारा बांबू उडून त्यांच्या चेहऱ्यावर आदळला. या अपघातात त्यांच्या डोळ्याला आणि हनवटीला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर जखमी ज्येष्ठ नागरिकांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार केले असले तरी या दुर्घटनेत त्यांचा एक डोळा कायमस्वरूपी निकामी झाल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत खारघर पोलिसांनी कंत्राटदार विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## खांदेश्वर मंदिराचा परिसर, तलावात स्वच्छता अभियान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संत निरंकारी समाज मंडळ खांदा कॉलनीच्या वतीने रविवारी (दि.२२) खांदेश्वर मंदिराचा परिसर व तलावाचे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

कार्यक्रमावरील निरंकारी मंडळाचे प्रमुख श्री पाटील साहेब यांच्या देखरेखी खाली सध्याचे स्वच्छता अभियान राबवण्यात आली. यावेळी तलावामध्ये पसरलेली कचरा साफ करण्यात आला. यावेळी खांदा कॉलनीतील धडाडीचे नगरसेवक श्री एकनाथ गायकवाड भीमराव पोवार सरचिटणीस भाजप व खांदा कॉलनीतील तमाम निरंकारी भक्त समाविष्ट झाली.

पनवेल महानगरपालिकेचे प्रमुख श्री कांबळे साहेब व श्री रोकडे साहेब हे सुद्धा पनवेल महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांबरोबर उपस्थित होते. कार्यक्रमानंतर निरंकारी मंडळाकडून अल्पपार व चहा पाण्याची व्यवस्था करून कार्यक्रमाची सांगता झाली.

## कामोठे येथे विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर घोषणा

### शहिदी समागमनिमित्त भारताच्या नकाशाची मानवी प्रतिकृती साकार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम निमित्ताने पनवेल तालुक्यातील कामोठे येथील विश्वस्त इंडो स्कॉट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सुप्रसिद्ध गायक सरताज सिंग यांनी गायलेले 'हिंद-दी-चादर' हे गीत गायन सामूहिकरित्या केले. याचबरोबर विविध राज्यांच्या संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विद्यार्थ्यांचे संचलन हे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले.



यावेळी धर्मजागरण मंचचे कोकण प्रांत प्रमुख महेंद्र रायचुरा जी, हिंद दी चादर शहिदी समागम राज्य समितीचे मुख्य समन्वयक रामेश्वर नाईक, समन्वयक जगदीश सकवान, नवी मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, प्रशासन सहआयुक्त विजय म्हसाळ, पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, पनवेल उपविभागीय अधिकारी पवन चांडक, रायगड उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा हिंद दी चादर चे समन्वयक रविंद्र राठोड, प्र. उपसंचालक (माहिती) मनोज सानप, तहसिलदार मीनल भामरे, इंडो स्कॉट स्कूलचे विश्वस्त अजय श्रीवास्तव, गट शिक्षणाधिकारी शाहू सतपाल, गट शिक्षणाधिकारी नवनाथ साबळे, माध्यमिक शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे, प्राथमिक शिक्षणाधिकारी ललिता दहितुले, पनवेल महापालिका शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे, सुनिता चांदोरकर, विस्तार अधिकारी पनवेल सिताराम मोहिते, अधीक्षक कल्पना काकडे, लखविंदर सिंग, इंडो स्कॉट स्कूलच्या प्राचार्या मेमूल जितेष आदी उपस्थित होते.

रायगड जिल्हा परिषद कोपरा, शाळेच्या विद्यार्थ्यांनी गायलेल्या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या निमित्ताने रुपेश मढवी व संतोष खरे या विद्यार्थ्यांनी श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावर आधारित गीत सादर केले.

प्रास्ताविक करताना हिंद दी चादर शहिदी समागम राज्य समितीचे मुख्य समन्वयक रामेश्वर नाईक यांनी इतिहासातील दाखले देत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या बलिदानाची कथन केली. त्याचबरोबर राष्ट्रकार्यामध्ये आपण प्रत्येकाने आपआपल्या परीने योगदान देणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. तसेच हिंद दी चादर शहिदी समागम कार्यक्रमाची रुपरेषा स्पष्ट केली.

धर्मजागरण मंचचे कोकण प्रांत प्रमुख महेंद्र रायचुरा जी यांनी राष्ट्रीय व सामाजिक कर्तव्याच्या भावनेतून राष्ट्रकार्य घडण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन निंबाजी गिते यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांनी केले.

## पनवेल मनपातर्फे महिलांचा होणार गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिनानिमित्त ९ मार्च रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमात पनवेल महापालिका क्षेत्रातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करून गौरविण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर, पनवेल महानगरपालिका हद्दीत वास्तव्यास असलेल्या शिक्षण, समाजसेवा, आरोग्य, क्रीडा, कला, उद्योग, प्रशासन, पर्यावरण, महिला सक्षमीकरण तसेच इतर कोणत्याही क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महिलांची माहिती मागविण्यात येत आहे.

उत्कृष्ट कामगिरी केलेल्या महिलांची माहिती महापालिकेने निर्धारित केलेल्या विहित नमुन्यात महिला व बालकल्याण विभागाकडे २६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्राप्त अर्जांमधून निवड करण्याचा अंतिम अधिकार निवड समिती सदस्यांना राहणार आहे. या अर्जाचा नमुना व सविस्तर माहिती www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी दिली आहे.

## पनवेल पालिकेच्या शाळांमध्ये स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने शासनाच्या महत्त्वाकांक्षी माझी वसुंधरा ६.० पर्यावरण सेवा योजनेंतर्गत पालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळांमध्ये पर्यावरण जनजागृतीपर उपक्रमांचे नुकतेच यशस्वी आयोजन करण्यात आले.

पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाबाबत जागरूकता आणि प्लास्टिकमुक्त पनवेल घडविण्याच्या उद्देशाने उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनुसार पालिका शाळा क्रमांक ७, तक्का, पालिका उर्दू स्कूल पनवेल, पालिकेची सावित्रीबाई फुले शाळा, जिल्हा परिषद उर्दू स्कूल ओवे पेठ, जिल्हा परिषद शाळा मोर्बी खारघर, रायगड जिल्हा परिषद शाळा कोपरा,सुधागड एज्युकेशन सोसायटी कोपरा या शाळांमध्ये विविध स्पर्धा व मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली.



या उपक्रमांतर्गत हवामान बदल विषयक परिसंवाद, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन परिसंवाद, हवामान बदलाचे पर्यावरणावरील विषयावरील निबंध स्पर्धा, बेस्ट आऊट ऑफ वेस्ट वस्तू निर्मिती स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश दिला.

माझी वसुंधरा ६.० ही योजना पर्यावरण संवर्धनासाठी जनसहभाग वाढविणारी महत्त्वपूर्ण मोहिम असून जल संवर्धन, वृक्षारोपण, ऊर्जा बचत, कचरा व्यवस्थापन व जैवविविधता संवर्धन या घटकांवर विशेष भर देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासून पर्यावरणाबाबत जागरूकता व जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरत आहे.

## संपादकीय

# लहरीपणा कुठवर?

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प वयोमानानुसार लहरी होत चालले आहेत असे मत अमेरिकेतील बहुसंख्य लोकांनी व्यक्त केल्याचे 'रॉयटर्स' आणि 'इप्सॉस'ने अमेरिकेत नुकत्याच केलेल्या जनमत चाचणीतून समोर आले आहे. खरे तर यात नवीन काय असे कुणी म्हणावे इतका ट्रम्प यांच्या लहरीपणाचा फटका गेला काही काळ अवघे जग अनुभवत आले आहे. भारताला तर ट्रम्प यांनी पुन्हा पुन्हा लक्ष्य केले आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही, इतके अडचणीत आणणारे दावे ट्रम्प भारतासंदर्भात अजुनही करत आहेत.

**गेल्या वर्षी भारत-पाकिस्तान युद्ध आपण थांबवले असा दावा ट्रम्प यांनी आता पुन्हा एकदा केला असून आपण या युद्धात हस्तक्षेप केला नसता तर या दोन देशांमध्ये अणुयुद्ध पेटले असते व साडेतीन कोटी लोक मृत्युमुखी पडले असते, असे पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाझ शरीफ यांनी आपल्याला सांगितल्याचे ट्रम्प यांनी आता म्हटले आहे. वर्षभरात जगभरातील आठ युद्धे रोखल्याचाही ट्रम्प यांनी पुनरुच्चार केला आहे. व्हाइट हाऊसमधील आपल्या कार्यकाळाला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ट्रम्प बोलत होते. ट्रम्प यांचे भारत-पाकिस्तान युद्धासंदर्भातील सारे दावे भारताने यापूर्वी अनेकदा अप्रत्यक्षपणे फेटाळून लावले आहेत. परंतु त्याचा कोणताही परिणाम ट्रम्प यांच्यावर झालेला दिसत नाही. जगभरातली इतकी युद्धे थांबवूनही शांततेचा नोबेल पुरस्कार आपल्या हाती न लागल्याची खंत बहुदा ट्रम्प यांना वाटत असावी व त्या अपेक्षाभंगाच्या दु:खातून ते पुन्हा पुन्हा हे असले दावे करत असावेत. पण ट्रम्प यांच्या या पोकळ दाव्यांना आता जगभरात कुणीही गांभीर्याने घेत नसावे. जगभरातले सोडा, अमेरिकेतले लोकही त्यांच्या लहरीपणाबद्दल नाराज असल्याचे तेथील एका ताज्या जनमत चाचणीत स्पष्ट झाले आहे. या जनमत चाचणीत ६१ टक्के अमेरिकी लोकांनी ट्रम्प यांच्या लहरीपणाबद्दल नाराजी व्यक्त केली असून चाचणीत सहभागी लोकांपैकी ३० टक्के लोक ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचे समर्थक आहेत. ट्रम्प यांच्या लहरी धोरणांचा फटका जागतिक अर्थव्यवस्थेलाही पुन्हा पुन्हा बसतो आहे. आयात शुल्काचा अस्त्रासारखा वापर करून अनेक देशांना त्यांनी गेल्या वर्षभरात हैराण केले असून अखेर अमेरिकेच्या सर्वो च्च न्यायालयानेच हस्तक्षेप करून ट्रम्प यांचे हे धोरण बेकायदा ठरवले. भारताला तर ट्रम्प यांनी यासंदर्भात विशेष लक्ष्य केले. रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल २५ टक्के अतिरिक्त आयातशुल्क लावून त्यांनी भारतावर एकूण ५० टक्के शुल्क लादले. भारत-अमेरिका व्यापार कराराबद्दल घोषणा करताना त्यांनी हे आयातशुल्क १८ टक्क्यांवर आणले. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने त्यानंतर यासंदर्भात ट्रम्प यांच्या विरोधात निकाल दिला. अर्थात ट्रम्प यांनी तरीही आयातशुल्कासंदर्भातील आपले बेलगाम घोषणांचे धोरण सुरूच ठेवले आहे. ट्रम्प यांनी शुक्रवारी घोषणा केल्याप्रमाणे मंगळवारपासून दहा टक्के आयातशुल्क लागू झाले असल्याचे सीमाशुल्क आणि सीमा संरक्षण (सीबीपी) विभागाने जाहीर केले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांनी १५ टक्के आयातशुल्क आकारण्याची घोषणा केली. त्यात बदल होणार नसल्याचे व्हाइट हाऊसने स्पष्ट केले असले तरी ट्रम्प आणि सीबीपीने केलेल्या या वेगवेगळ्या घोषणांमुळे आयातशुल्काच्या नेमक्या दरावरून गोंधळ कायम आहे. एकीकडे आयातशुल्कावरून गोंधळ निर्माण करायचा व दुसरीकडे युद्धासारख्या मुद्यावर अडचणीत आणणारे दावे करायचे असा दबावाचा लहरी खेळ ट्रम्प भारताशी खेळत आहेत.**

# पोलादपूरकरांची वाढीव घरपट्टी माफ करण्याचे साकडे



पोलादपूर तालुक्याच्या गावाच्या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रूपांतर करण्यात आल्यानंतर पोलादपूर शहरवासियांना कोणत्याही नागरी सुविधा देण्यास नगरपंचायत प्रशासन असमर्थ ठरले असताना घरपट्टीवाढीचा वाढीव बोजा नागरिकांवर लादण्यात आला आहे. ही वाढीव घरपट्टी अवाजवी आणि नागरिकांना अन्यायकारक ठरणार असल्याने नागरिकांकडून स्थापन करण्यात आलेल्या पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाकडून वेळोवेळी पाठपुरावा करून पोलादपूर नगरपंचायतीसह जिल्हा प्रशासन आणि राज्यसरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

राज्यात या नव्या १३८ नगरपंचायतींची घोषणा होण्यापूर्वी केवळ सात नगरपंचायती अस्तित्वात होत्या. महानगरपालिका २६, अ वर्गातील नगरपरिषदा १२, ब वर्गातील नगरपरिषदा ६१, क वर्गातील नगरपालिका १४५ अशा एकूण २५१ स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात होत्या. या १३६ नगरपंचायतींची घोषणा झाल्यानंतर रायगड जिल्हयातील माणगांव, तळा, सुधागड, खालापूर, म्हसळा आणि पोलादपूर या तालुक्यांच्या ग्रामपंचायतींना नगरपंचायतींचा दर्जा मिळणार असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले होते.

अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण आणि सुनियोजित विकासाचा मुख्य मुद्दा घेऊन राज्यसरकारने ही घोषणा केली.

राज्यसरकारने तालुक्याचे गांव असलेल्या ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायतीमध्ये करण्याचा निर्णय घेतल्याने, ग्रामपंचायतीला भेडसावणारी विविध विकासकामांसाठीच्या जमिनीचे क्षेत्र तसेच गावठाण विस्ताराची समस्या कायम राहिली.

पोलादपूर नगरपंचायतीची निर्मिती झाल्यापासून आजतागायत अग्निशमन यंत्रणा, जलशुध्दीकरण प्रकल्प व २०२२च्या लोकसंख्येला पूरक पाणीपुरवठा योजना, नगरपंचायतीच्या शाळा व खासगी शाळांसाठीच्या नियमावली, स्वच्छता आणि दिवाबत्ती, अंतर्गत रस्ते, अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे तसेच क्रीडासंकूल, डम्पिंग झोन, घनकचरा प्रक्रिया केंद्र, गॅसशवदाहिनी, विद्युत स्मशानभूमी, गटारे, रस्तेनिर्मिती, नगररचना, हरितपट्टा, गार्डन तसेच अन्य सुविधांचा अभाव व कमतरता तीव्रतेने जाणवित आहे.

**घरपट्टीवाढ अन्याय्य कशी?**

नगरपंचायतीने लोकसभा निवडणुकीपूर्वी दि.२० नोव्हेंबर२०२३ रोजी घरपट्टीवाढीचा आदेश बजावल्यानंतर त्याबाबत नागरिकांना संभ्रम निर्माण होऊन पूर्वीची घरपट्टी भरण्यासंदर्भात नागरिकांकडून दीरंगाई सुरू झाली. पोलादपूर शहरातील विविध प्रभागांतून नगरपंचायतीने नेमलेल्या खासगी ठेकेदाराकडून दोन-चार तरूणांमार्फत दोन वर्षांपूर्वी नागरिकांच्या घरांची मोजणी लेझर यंत्राद्वारे झाल्यानंतर घरांचे पुनर्मुल्यांकन करण्याची प्रक्रिया संबंधित ठेकेदाराने पूर्ण करून महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५चे कलम १०६ अ अन्वये सन २०२७-२९ मध्ये आकारण्याच्या मालमत्ता कराची रक्कम अनाकलनीयरित्या निर्धारित केली आहे. त्या रक्कमेच्या २० टक्के रकमेची आकारणी घरपट्टी म्हणून सन २०२४-२५ मध्ये आकारण्यात येणार आहे. या रक्कमेमध्ये इमारत ३० ते ५० वर्षे जुनी असल्याकडे दूर्लक्ष करून नवीन असल्याचा गैरसमज कायम ठेऊन पहिल्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी म्हणजे २०२५-२६, २०२६-२७ आणि २०२७-२८ या वर्षी या इमारतींना घसारा ० टक्के ठेवण्यात येणार असून त्यानंतर काही टक्के घसारा वजा करण्याचे उपकार ८० टक्के अधिक घरपट्टी आकारणीवेळी होणार आहे. ही घरपट्टीवाढीची गंभीर बाब लेझर मशिनने मोजणीदरम्यान नगरपंचायत पोलादपूरच्या सर्वच सत्ताधारी व विरोधी नगरसेवक आणि अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांनी नागरिकांपासून लपवून ठेवल्याचे दिसून आले. यासंदर्भात, रायगड लोकसभा खासदार सुनील तटकरे आणि विधानपरिषदेचे सदस्य आ.प्रवीण दरेकर यांना निवेदने देऊन झाल्यानंतरही आधी नगरपालिका आणि नंतर जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांमुळे हालचाली थंडावल्या.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

यासंदर्भात कोणताही अनुकूल प्रतिसाद नगरपंचायत पोलादपूरकडून मिळत नसल्याने पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचातर्फे दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाला नगरपंचायत पोलादपूरतर्फे पुनर्मोजणी करूनच मालमत्ता करवसुली करण्याची ग्वाही देण्यात आली आणि कलम १०७ प्रमाणे नगरपंचायतीचा ठराव झाल्यानंतर तात्काळ नियमोचित कारवाई करण्याची भूमिका घेत नगरपंचायत हद्दीतील शेवटच्या मालमत्ताधारकाची मोजमापे दुरूस्त करून योग्यरित्या मालमत्ताकर आकारला जाईल, असे लेखी पत्र मुख्याधिकारी विनय शिपाई यांनी स्वाक्षरीसह दिले.

यानंतर नगरपंचायत पोलादपूरकडून कलम १०७ प्रमाणे नगरपंचायतीचा ठराव आला. यामध्ये सर्व मिळकत धारकांना सन २०२५-२६ व सन २०२६-२७ करिता मालमत्ता कर आकारणीमध्ये १०० टक्के सुट देण्याचा उल्लेख करून आवश्यक तो प्रस्ताव शासनाकडे मंजूरीला पाठविण्यात आला आहे. मात्र, या ठरावामध्ये नमूद मालमत्ता कर आकारणीमध्ये १०० टक्के सुट देण्याचा उल्लेख हा शासनाकडून मान्य होईल, अथवा कसे याबाबत संभ्रम निर्माण झाला असून हा ठराव फेटाळला गेल्यास नगरपंचायत हद्दीतील सर्व मिळकतधारकांना वाढीव घरपट्टीसह करभरणा करावा लागणार आहे.

यानंतर दि.२४ डिसेंबर २०२५ रोजी प्राप्त हरकतींबाबत जनसुनावणीचे नाटक नगरपंचायत कार्यालयामध्ये करण्यात आले असता पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाच्या सदस्य नागरिकांनी ही जनतेला अंधारात ठेऊन होणारी जनसुनावणी आणि त्याद्वारे करण्यात येणारी वाढीव घरपट्टी आकारणी हा जनतेविरूध्द केलेला कट असल्याचे निदर्शनास आणून जनसेवक म्हणून अधिकाऱ्यांनी जनहिताची भूमिका घेण्याचे आवाहन केले. यानंतर रायगड जिल्हा माहिती कार्यालयामध्ये नोंद नसलेल्या आणि पोलादपूर शहरामध्ये अधिकृतरित्या खपाचा आकडा माहिती आणि जनसंपर्क संचालनालयामार्फत जारी झाला नसलेल्या दैनिक ठाणे टाईम्स वृत्तपत्रामध्ये दि.३० डिसेंबर २०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द करून घरपट्टी जमा केल्याखेरिज हरकती स्विकारल्या जाणार नसल्याचे अन्याय्य आवाहन पोलादपूर नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरीने करण्यात आले होते. ही बाब नगररचनाकारांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

यानंतर पुन्हा नगरपंचायत पोलादपूरकडून नागरिकांना जानेवारी २०२६ मध्ये दि.१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ कालावधीचे कराचे बिल देण्यात येऊन त्यामध्ये मालमत्ता कर, वृक्ष कर, महा.शिक्षण कर, उपयोगकर्ता शुल्क अशा करांची आकारणी करण्यात आली आहे. या बिलामध्ये दि.०१ एप्रिल २०२५ ते दि.३०सप्टेंबर २०२५ आणि दि.०१ ऑक्टोबर २०२५ ते दि.३१ एप्रिल २०२६ अशा सहामाही कराच्या मागणीचा उल्लेख दिसून येतो. यामध्ये घरपट्टी व्यतिरिक्त करांची रक्कम ही घरपट्टीच्या ५० टक्केहून अधिक असल्याचे दिसून येते. तर करयोग्य मूल्यदेखील चटईक्षेत्र व निवासीवापरासाठी आतापर्यंतच्या घरपट्टीच्या रक्कमेच्या ५ पटीने अधिक असल्याचे या मागणी बिलांमध्ये नमूद करण्यात आल्याचे दिसून येते. या सहामाही वाढीव घरपट्टी कर मागणीपत्रानुसार करभरणा करणे दरवर्षी पूर्वे ला पूरस्थिती उदभवणाऱ्या आणि पश्चिमेला असलेला मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ अंडरपास गेल्यामुळे पोलादपूरकर नागरिकांना अन्यायकारक ठरणार आहे.

पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचातर्फे नगरपंचायत पोलादपूरतर्फे आकारण्यात आलेल्या वाढीव घरपट्टीसंदर्भात फेरविचार करून वाढीव घरपट्टी १०० टक्के रद्द करण्यात येईल, अशी भूमिका घेण्यास शासनाला भाग पाडावे, असे आवाहन राज्याचे मंत्री आणि महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार भरतशेठ गोगावले आणि पोलादपूरचे सुपुत्र विधानपरिषदेतील भाजपचे गटनेते आ. प्रवीणभाऊ दरेकर यांच्याकडे करण्यात आले. विधीमंडळ अधिवेशनामध्ये लक्ष्यवेधी प्रश्न विचारण्याची भूमिका घेतल्याने पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाला आ.दरेकर यांनी दिलेल्या ग्वाहीबद्दल पोलादपूरकरांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# उन्हाळा सुरू होण्यापूर्वी बाईकची काळजी घ्या

भारतात उन्हाळा खूप कडक असतो आणि तुम्हाला तुमची बाईक सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. तुम्ही तुमची बाईक दररोज वापरत असाल किंवा कमी वापरत असाल, उन्हाळ्यात जर तुम्ही तिची काळजी घेतली नाही तर तुम्हाला देखभालीच्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल. नियमित बिघाड होण्यापासून ते जास्त इंधन वापरण्यापर्यंत तुम्हाला अनेक गोष्टींची काळजी घ्यावी लागेल. यासाठी नक्की काय काय करायला हवं हे आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.




टायर्स हे तुमच्या बाईकचा सर्वात महत्त्वाचा घटक आहेत. टायर्स तुमच्या गाडीला पुढे घेऊन जातात, संतुलन देतात आणि तुमचा प्रवास सुरक्षित करण्यासाठी काम करतात. म्हणूनच तुम्हाला बाईकच्या टायर्सच्या स्थितीकडे जास्त आणि खूप बारकाईने लक्ष देणे आवश्यक आहे. टायरवरील धागे लवकर झिजू नये याची काळजी घ्या, गाडीला योग्य आधार देण्यासाठी हे धागे खूप महत्त्वाचे आहेत. जर ट्रेड्स जीर्ण झाले तर टायर्स घसरू शकतात आणि त्यामुळे गंभीर अपघात होऊ शकतात, म्हणूनच तुम्ही नियमितपणे टायर्स तपासले पाहिजेत.

पेट्रोलपासून ब्रेक ऑइलपर्यंत आणि इंजिन ऑइलपर्यंत, गाडी चांगली चालावी म्हणून तुम्हाला इंधन भरावे लागते. जर तेलांमध्ये समस्या असेल तर तुम्हाला समस्या उद्भवू शकते. ब्रेक ऑइल, इंजिन ऑइल इ. उन्हाळ्यात तुमची बाईक सुरळीत चालत राहण्यासाठी, नियमितपणे तपासणी आवश्यक असते . इंजिन मधिल द्रवपदार्थ तपासा. हे एक महत्त्वाचे काम आहे आणि तुम्ही ते वगळू नये.

**संपूर्ण टाकी भरणे टाळा**

विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसात तेल उष्णतेमुळे पसरते. जेव्हा तुम्ही इंधन टाकी पूर्णपणे भरता तेव्हा इंधन पसरण्यासाठी जागा राहत नाही. जेव्हा तुम्ही बाईक सुरू करता आणि ती काही काळ चालते तेव्हा इंजिन आणि इतर घटक आतून गरम होतात. हवामानामुळे बाहेरून येणारी उष्णता देखील बाईकच्या तापमानात योगदान देते, यामुळे इंधन बाहेर सांडते. उष्णतेमुळे ते पेटू शकते त्यामुळे ही सर्व गळती खूप धोकादायक असू शकतात आणि त्यामुळे तुमच्या बाईकमध्ये बिघाड होऊ शकतो.

# स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर



**निमित्त**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील भगूर गावी झाला. त्यांच्या आईचे नाव राधाबाई सावरकर आणि वडिलांचे नाव दामोदरपंत सावरकर होते. ते अवघे नऊ वर्षाचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांचा सांभाळ त्यांचे थोरले बंधू बाबाराव आणि त्यांची पत्नी येसूवहिनी यांनी केला

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे प्राथमिक शिक्षण नाशिकच्या शिवाजी विद्यालयामध्ये झाले ते लहानपणापासूनच अत्यंत बुद्धिमान होते. वक्तृत्व, काव्यरचनांवर त्यांचे प्रभुत्व होते. लहानग्या सावरकरांनी चाफेकर बंधूंना फाशी देण्यात येण्याचे वृत्त समजताच आपल्या कुलदेवीआई भगवती हिच्या पुढे देशाच्या स्वातंत्र्यातेसाठी क्रांतीचा सेतू उभारून मारिता-मारिता मरेतो झुंजेन अशी शपथ घेतली. सावरकरांनी जोसेफ मॅझिनीयांच्या आत्मचरित्राचे मराठीत भाषांतर केले. त्यांचा विवाह यमुनाबाई यांच्याशी झाला. त्यांनी फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला. नंतर ते उच्च शिक्षणासाठी लंडनला गेले.

लंडनमध्ये इंडिया हाऊसमध्ये अभिनव भारताचे क्रांतिपर्व सुरू झाले. जातीव्यवस्था मोडण्यासाठी त्यांनी सात बेड्या मोडायला हव्यात असे सांगितले. पॅरिसहून लंडनला येताना सावरकरांना अटक करण्यात आली होती. पुढील खटला भारतात चालवला जावा म्हणून भारतात येताना त्यांनी फ्रान्सच्या मार्सेलिस बंदरात समुद्रात उडी घेतली, पण त्यांचा तो प्रयत्न अयशस्वी ठरला. ब्रिटिश सरकारने त्यांना अटक करून भारतात आणले. इथे त्यांच्यावर खटला भरण्यात आला. त्यांना जन्मठेप म्हणून काळ्या पाण्याची शिक्षा देण्यात आली. मातृभूमीचे स्वातंत्र्य मिळविण्यासासाठी त्यांनी तब्बल ११ वर्षे छळ सहन करूनदेखील त्यांच्यात देशसेवा करण्याची जिद्द होती. त्यांनी काळ्या पाण्यात असताना तुरुंगाच्या भिंतीवर महाकाव्ये लिहिली. काळे पाणी असे पुस्तकाचे लेखनदेखील केले. त्यांचे गीत 'ने मजसीने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला' हे आजतायागत लोकांचा मनात अजरामर आहे.

अंदमानातून सुटल्यानंतर सावरकरांना ब्रिटिशांनी रत्नागिरीत स्थानापन्न केले गेले. तेथे त्यांनी समाजाला संघटित करण्याचे कार्य केले. त्यांनी रत्नागिरीमधील वास्तव्यामध्ये अनेक समाजसुधारणा केल्या. जवळपास पाचशे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केली. अनेक आंतरजातीय विवाह लावले. सर्वांसाठी पतित पावन मंदिर सुरू केले व सामाईक भोजनालय सुरू केले. जातिभेद तोडण्यासाठी सहभोजनाचे आयोजन केले. ते अखिल भारतीय हिंदू महासभेचे अध्यक्ष झाले आणि भारत छोडो चळवळीचा भाग बनले. भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचे राजकारणी. जातिभेदाचा विरोध करणारे. क्रांतिकारक, भाषाशुद्धी लिपिशुद्धी, साहित्य प्रचारक असे अनेक पैलूंचे धनी होते. सावरकरांना 'स्वातंत्र्यवीर सावरकर' अशी उपाधी प्रल्हाद केशव अत्रे यांनी दिली होती.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अन्न आणि औषध वर्ज्य केले त्यामुळे त्यांची प्रकृती खालावली. २६ फेब्रुवारी १९६६ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# वाढलेले वजन कमी करण्यासाठी हे करा...

दररोजच्या धावपळीच्या आयुष्यात आपण आरोग्याकडे लक्ष देत नाही. चुकीची जीवनशैली आणि पौष्टिक आहार न घेतल्यामुळे वजन वाढीची समस्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. वजन वाढल्यानंतर ते कमी करण्यासाठी अनेक जण वाट्टेल ते प्रयत्न करतात. एवढंच नाही तर आहारामध्येसुद्धा बदल करतात. न्यूट्रिशनिस्ट अंजली मुखर्जी सांगतात, दिवसभर थोडे थोडे खाल्ल्याने वजन कमी करण्यास मदत होऊ शकते.



अनेक जण वजन कमी करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचा आहार घेतात. कधी उपवास करतात तर कधी कॅलरी मोजतात, पण तज्ज्ञांच्या मते थोडे थोडे खाणे, वजन कमी करण्यासाठी प्रभावी मार्ग आहे. जेव्हा तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल, त्यावेळी दिवसभर थोडे थोडे खाणे गरजेचे आहे; पण लक्षात ठेवा प्रत्येकवेळी अन्नाचे प्रमाण कमी असावे. यामुळे तुम्हाला फायदा होऊ शकतो.

अंजली मुखर्जी यांच्या मते, अभ्यासातून असे समोर आले की, वारंवार थोडे थोडे खाल्ल्याने चयापचय क्रिया चांगली होते आणि भूक कमी लागते. तुमच्या शरीराला दिवसभर ऊर्जा मिळते, ज्यामुळे शरीरातील कोलेस्ट्रॉल आणि इन्सुलिनच्या पातळीवर याचा चांगला परिणाम दिसून येतो.

याविषयी अंजली मुखर्जी पुढे सांगतात, तुम्ही जेवढे कॅलरीचे सेवन करता त्यापेक्षा जास्त वजन आणि फॅट कमी करण्यासाठी कॅलरी बर्न कराव्यात आणि हे कसे शक्य आहे तर दिवसभर काही ठराविक वेळेनंतर कमी प्रमाणात जेवण केल्याने हे सहज करता येऊ शकते.

दिवसभर वारंवार, पण कमी प्रमाणात खाणे ऊर्जेचा एक प्रमुख स्त्रोत आहे आणि याचा परिणाम व्यक्तीच्या वजनावरही दिसून येतो. म्हणून वजन नियंत्रित करण्यासाठी दिवसभर थोडे थोडे खाणे खूप महत्वाचे आहे, असे न्यूट्रिशनिस्ट गरिमा गोयल यांनी पूर्वी सांगितले होते.

अंजली यांनी कमी प्रमाणात खाता येणारे काही अन्नपदार्थ सुचविले आहे, ज्यामुळे तुम्ही वजन कमी करू शकता...

एक कप सोया दूध आणि बदाम; चिकन, काकडी, टोमॅटो चटणी किंवा पनीर टाकून बनवलेले गव्हाच्या ब्रेडचे अर्धे सँडविच; सॅलेडबरोबर एक वाटी मूग डाळ; चण्यासह मूठभर शेंगदाणे; जेवणात नेहमीपेक्षा पोळीची संख्या कमी करा; एका टोस्टबरोबर दोन अंड्यांचे पांढरे ऑम्लेट किंवा पूर्ण अंड्याचे ऑम्लेट करा; एक सफरचंद, संत्र, २० चेरी किंवा एक वाटी टरबूज; एक वाटी डाळ किंवा सॅलेडबरोबर दही यांचे सेवन करा.

# श्रीवर्धनमधील 'आधार' केंद्र एक महिन्यापासून बंद

**श्रीवर्धन: रामप्रहर वृत्त**




श्रीवर्धन शहर व तालुक्यातील नागरिकांना गेल्या तब्बल ११ महिन्यांपासून आधार कार्ड सेवेसाठी अक्षरशः वणवण भटकावे लागत आहे शहरातील तीनही आधार नोंदणी व अद्ययावत (अपडेट) केंद्रे बंद असल्याने नवीन नोंदणी, पत्ता बदल, मोबाईल क्रमांक लिंक, बायोमेट्रिक अपडेट, दुरुस्ती आदी सर्व कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. परिणामी, हजारो नागरिकांचे शासकीय कामकाज रखडले असून संपूर्ण तालुक्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आधार अपडेट किंवा नोंदणीसाठी नागरिकांना बोर्ली पंचतन, म्हसळा, महाड,माणगाव, आदी नजीकच्या तालुक्यांमध्ये जावे लागत आहे. एका अपडेटसाठी किमान एक दिवस खर्ची पडत असून प्रवास, भोजन व इतर खर्च मिळून ५०० ते १००० रुपयांपर्यंत आर्थिक भार सहन करावा लागत आहे. रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना दिवसाचा मजुरी तोटा सहन करावा लागत असल्याने आर्थिक अडचणी अधिक तीव्र झाल्या आहेत.

आधार कार्ड हे शिष्यवृत्ती, संजय गांधी निराधार योजना, वृद्धापकाळ पेन्शन, गॅस अनुदान, पीएम किसान योजना, बँक व्यवहार, शालेय प्रवेश, जात व उत्पन्न प्रमाणपत्र यांसारख्या विविध शासकीय सेवांसाठी अनिवार्य आहे. मात्र शहरात सेवा उपलब्ध नसल्याने अनेक लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जांना विलंब होत आहे, ज्येष्ठ नागरिकांच्या पेन्शन प्रस्तावांमध्ये अडथळे निर्माण झाले आहेत, तर बँक खात्यांशी आधार लिंक नसल्याने व्यवहार अडकले आहेत.

विशेषतः दिव्यांग व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकांना बाहेरगावी प्रवास करणे अत्यंत जिकिरीचे ठरत आहे. बायोमेट्रिक अपडेटसाठी वारंवार फेऱ्या माराव्या लागत असल्याने त्यांची शारीरिक व मानसिक दोन्ही प्रकारची झीज होत आहे. आधार अपडेट नसल्याने दिव्यांग प्रमाणपत्राची प्रक्रिया थांबली आहे, अशी व्यथा काही लाभार्थ्यांनी व्यक्त केली. महिलांनाही लहान मुलांसह बाहेरगावी जावे लागत असल्याने मोठी गैरसोय होत आहे.

नागरिकांनी तहसील कार्यालय, पंचायत समिती तसेच संबंधित विभागांकडे अनेक वेळा लेखी निवेदने दिली आहेत. मात्र अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याचा आरोप होत आहे. श्रीवर्धनसारख्या ऐतिहासिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या शहरात आधार केंद्र नसणे ही गंभीर व लाजिरवाणी बाब आहे, अशी प्रतिक्रिया स्थानिक सामाजिक संघटनांनी व्यक्त केली आहे.

लवकरात लवकर किमान एक कायमस्वरूपी आधार सेवा केंद्र सुरू करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. लोकप्रतिनिधींनीही या प्रश्नात तातडीने हस्तक्षेप करून प्रशासनावर दबाव आणावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# जिल्हा कारागृहात त्वचारोग तपासणी शिबिर कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

समता फाऊंडेशन मुंबई या सामाजिक संस्थेमार्फत सामाजिक बांधीलकी जपत अलिबाग जिल्हा कारागृहातील बंद्यांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथील तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली (दि.२४) रोजी अलिबाग जिल्हा कारागृहात त्वचारोग तपासणी शिबीर कार्यक्रम संपन्न झाला.



या आरोग्य शिबीरात डॉ. सुयश विरकर (त्वचारोगतज्ज्ञ) यांनी बंदी बांधवांना त्वचारोगाची लक्षणे, उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच त्वचारोग निदान आणि मोफत उपचार यावर भर देण्याच्या अनुषंगाने कारागृहात दाखल २९ बंद्यांची त्वचारोगबाबतची तपासणी करण्यात आली. हे आरोग्य शिबीर अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधार सेवा,पुणे डॉ. सुहास वारके (भा.पो.से) व विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा पुणे योगश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले.

या शिबिर कार्यक्रमाकरिता जिल्हा कारागृह अधीक्षक विशाल बाळासाहेब बांदल, डॉ.सुयश विरकर (त्वचारोगतज्ज्ञ) जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग, डॉ.निशिगंधा माळी (वैद्यकीय अधिकारी) अलिबाग, जिल्हा कारागृह, सतिश प्रभाकर जुंबळे, सोमनिंग कट्टेपा कांबळे (कारागृह शिपाई) इत्यादी कारागृह अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

# वाडगाव ग्रा.प. मध्ये मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान

**रेवदंडा : प्रतिनीधी**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव ग्रामपंचायतीमध्ये मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाची पहाणी राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे यांनी भेट देवून केली.



मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत स्वच्छता मोहिम व कचरा व्यवस्थापन, स्वच्छ पाणी व आरोग्य सुविधा, शेतकरी व स्थानिक उदयोजक सक्षमीकरण, घरकुल योजना व सौर उर्जेचा वापर तसेच डिजीटल शाळा हे स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत आहेत. वाडगाव ग्रामपंचायतीने मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत हे स्तुत्य उपक्रम राबविले आहेत. या स्तुत्य उपक्रमाची पहाणी करण्यासाठी शुक्रवार दि. २० फेब्रुवारी रोजी राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा भोसले व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे यांनी भेट देवून पहाणी केली. यावेळी वाडगाव ग्रामपंचायत सरपंच सारिका पवार, माजी सरपंच सरिता भगत, उपसरपंच जयेंद्र भगत, तसेच वाडगाव ग्रामपंचायत सर्व सदस्या, सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारीवर्ग तसेच राजिप अधिकारीवर्ग यांची उपस्थिती होती.

प्रारंभी राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे यांचे स्वागत वाडगाव ग्रा.प.सरपंच सारिका पवार, माजी सरपंच सरिता भगत तसेच ग्रामपंचायत सदस्या यांनी केले त्यानंतर राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे यांनी अंतर्गत स्वच्छता मोहिम व कचरा व्यवस्थापन, स्वच्छ पाणी व आरोग्य सुविधा, शेतकरी व स्थानिक उदयोजक सक्षमीकरण, घरकुल योजना व सौर उर्जेचा वापर तसेच डिजीटल शाळा यांची पहाणी केली.

# चौल गुमगल्ली येथे नुतन क्रॉंकिट रस्त्याचा शुभारंभ

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल गुमगल्ली नुतन क्रॉंकिट रस्त्याच्या शुभारंभ सोहळा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. यावेळी नवनिर्वाचीत जिल्हा परिषद सदस्य डॉं.सचिन राउळ, चौल पंचायत समिती सदस्या अंकिता अंकुश घरत, नागाव पंचायत समिती सदस्य शरद गोंधळी यांची प्रमुख उपस्थितीसह चौलचे जेष्ठ कार्यकर्ते प्रविण राउत, शिवसेना गटविभाग प्रमुख प्रशांत शेणवईकर, शिवसेना शाखा प्रमुख सिध्देश शेवणईकर, अलिबाग-मुरूड मतदार संघ महिला पदाधिकारी तनुजा मोरे, भुषण मोरे, अंकुश घरत, सुर्यकांत उर्फ आप्पा म्हात्रे, तसेच गुमगल्ली ग्रामस्थ प्रकाश काबाळे, किशोर काबाळे, अशोक घरत, रणजीत घरत, सुबोध नाईक, सुधीर म्हात्रे, श्रध्दा काबाळे, अनिकेत घरत आदीची उपस्थिती होती.



चौल मध्ये चौल शिवसेनेच्या मागणीने व आमदार महेंद्र दळवी यांचे प्रयत्नाने तसेच जिल्हा परिषद सदस्य डॉं. सचिन राउळ यांच्या पाठपुराव्याने एमएमआरडीओ माध्यमातून चौल मधील अनेक रस्ता नुतनीकरणासाठी १९ कोटी २७ लाख रूपये निधी उपलब्ध करण्यात आला आहे. या निधीतून चौल गुमगल्ली रस्ता नुतनीकरण करण्यात येत आहे

प्रांरभी चौल पंचायत समिती सदस्या अंकिता अंकुश घरत यांनी पुजाअर्चा केली, त्यानंतर जिल्हा परिषद सदस्य डॉं. सचिन राउळ, पंचायत समिती सदस्य शरद गोंधळी, पंचायत समिती सदस्या अंकिता घरत, जेष्ठ कार्यकर्ते प्रविण राउत तसेच गुमगल्ली जेष्ठ ग्रामस्थ यांचे हस्ते श्रीफळ वाढवून तसेच जिल्हा परिषद सदस्य डॉं. सचिन राउळ यांचे हस्ते फित कापून शुभारंभ करण्यात आला.

# रोह्यात श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५०व्या शहीदी शताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रम

**नागोठणे : प्रतिनीधी**

श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी शताब्दी वर्षानिमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या वतीने हिंद दी चादर हा उपक्रम राबविण्यात येत असून या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश शिखांचे नववे गुरु,धर्म रक्षणासाठी आपले प्राण त्यागणारे धर्मरक्षक, प्रेम व सहिष्णुता या मूल्यांची जपणूक करणारे तसेच उत्कृष्ट तलवारबाजी कला अवघात असणारे श्री गुरु तेग बहादूर यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख संपूर्ण जगासह,भारतभर व महाराष्ट्र राज्यातील सर्व जनता व विद्यालयातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा आहे.

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार रोहा येथील कोएसो मेहेंदळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज चे प्राचार्य रमेश मोसे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १६ फेब्रुवारी रोजी निबंध, वकृत्व, चित्रकला,गीत गायन व घोषणा वाक्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

त्यानंतर दि. २३ फेब्रुवारी रोजी रोहा पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी श्रीमती मेघना धायगुडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहीब जी यांनी दिलेल्या बलिदानाचे महती सांगणारे गीत पंजाबी पार्श्वगायक श्री सतिंदर सरताज यांनी गायले आहे. या गीताचे मेहेंदळे हायस्कूलच्या एकूण २००० विद्यार्थ्यांनी एकत्रित गायन केले.





# एनएमएमएस परीक्षेत अशोक लोखंडे विद्यालयाचे विद्यार्थी ठरले अव्वल

**मुरुड : प्रतिनीधी**

केंद्र शासनाच्या शाळेतील आर्थिक दुर्बल घटकांमध्ये मोडणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांसाठी एन एम एम एस परीक्षेचे नियोजन केले जाते.आर्थिक दुर्बल घटकांमधील मुलांना शैक्षणिक प्रेरणा व आर्थिक मदत होण्याच्या दृष्टिकोनातून ही परीक्षा देश पातळीवर घेण्यात येते. पीटसई येथील अशोक ल लोखंडे विद्यालय हे ग्रामीण व डोंगराळ भागातील विद्यालय असताना देखील या शाळेतील १४ विद्यार्थी या परीक्षेत बसले होते.त्यापैकी सहा विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.त्यामुळे या शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.येथील शिक्षक वृदानी मुख्याध्यापक अरुण खुळपे सर यांच्या प्रमुख मार्गदर्शनखाली



एन एम एम एस परीक्षेसाठी विशेष मेहनत घेत हे धवल यश प्राप्त केले आहे.

सदरची परीक्षा डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आली होती.या परीक्षेचा नुकताच निकाल लागला असून येथील विद्यार्थी अव्वल ठरले आहेत.

उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन खेळूशेट वाजे व विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण खुळपे सर सर्व मार्गदर्शक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले. पुढील स्पर्धा परीक्षांसाठी शुभेच्छा दिल्या.


## TENDER NOTICE

**Girl's Toilet, Boy'sToilet, Science Laboratory, Library, Gents Staff Room**

Breaking Old Plaster Inside & Outside, New Plaster Inside & Outside, Door Frame & Doors, Window & Window Frames Sliding, Still Grills, Reparing All Electrical Work & Electric Equipments, Safety Doors, All Furniture Work Repair & New, Steel Work, All Interior Decorate Work, Plumbig Work

Approximately 45 Lakh

Submit-7 Days

**Address -** Shree Ganesh Vidyamandir & Jr. College Chembur, Mumbai

DNC Public School Gopalwadi, Osmanabad After The Work The Statement Should Be Submited

**सही/-** **सही/-**
**कार्यकारी विश्वस्त** **विश्वस्त**
**श्री गणेश एज्युकेशन ट्रस्ट**


# खा.धैर्यशील पाटील यांनी घेतली भाई पाशिलकर यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपसभापती तसेच जिल्हा परिषदेमधील विविध खात्यांचा यशस्वी कारभार सांभाळणारे रोहा तालुक्यातील ज्येष्ठ व मुरब्बी राजकीय नेते कैलासवासी मनोहर विष्णू पाशिलकर (भाई) यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांची भाजपाचे जिल्हाध्यक्ष तथा राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांनी सांत्वनपर भेट घेतली. भाई पाशिलकर हे रायगड जिल्ह्याच्या राजकारणातील अनुभवी व प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. तळागाळातील जनसामान्यांशी त्यांची घट्ट नाळ जोडलेली होती. विविध गावांमध्ये विकासकामे राबवून त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात ठसा उमटवला होता. त्यांच्या कार्यामुळे अनेक सर्वसामान्य नागरिकांना न्याय व विकासाची दिशा मिळाली होती.



यावेळी त्यांचे सुपुत्र विनोद पाशिलकर, जे सध्या रोहा तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत, तसेच त्यांच्या सौभाग्यवती विजया पाशिलकर या पंचायत समिती सदस्या उपस्थित होत्या. कुटुंबीयांशी संवाद साधत खासदार पाटील यांनी दिवंगत भाई पाशिलकर यांच्या कार्याचे स्मरण करत त्यांच्या योगदानाचा गौरव केला.

यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष अमित घाग, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस तथा भाजपाचे नगरसेवक रोशन चाफेकर, रोहा तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे, युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव, निलेश जंगम, दीपक पवार, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस वैभव कुलकर्णी यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## सावधान नोटीस

सर्व लोकांस सदर सावधान नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल **श्री. हरिश्चंद्र हिरामण मढवी** यांचे मालकीची, खास व खुद्द ताबेकब्जातील मौजे वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड, येथील खालील वर्णन केलेली मिळकत आहे. -

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे- वावंजे, तालुका -पनवेल, जिल्हा -रायगड**

| स.नं | हि.नं | क्षेत्र हे.आर.पॉ | आकर रु.पैसे |
|---|---|---|---|
| २०५ | २ | ०.२३.५० | ३.८१ |

सदरहू मिळकतीचे विक्री व्यवहाराचे कामी आमचे अशिल यांनी **श्री. नारायण ढोमा मढवी** यांना बयाना रक्कम दिलेली आहे. सदर जमीन मिळकत ही **श्री. हरिश्चंद्र हिरामण मढवी, श्री. नारायण ढोमा मढवी व श्री. जाकीर हुसेन अब्दुल गफार खान** यांचे सामाईक मालकी हिश्यातील आहे. सदरहू मिळकतीमध्ये आजरोजीपर्यंत कोणत्याही प्रकारचे सरस-निरस वाटप अथवा हिस्से झालेले नाहीत. सदर मिळकत ही आमच्या अशिलांच्या सामाईक मालकी हक्कात व ताबे कब्जामध्ये आहे. सदर जमीनी मध्ये आमच्या अशिलांचे क्षेत्र वाटप झालेले नाही. तसेच श्री. नारायण ढोमा मढवी यांनी त्यांचे हिश्श्याचा ताबा देखील आमच्या अशिलांना बयाणा रक्कम स्विकारतेवेळी दिलेला आहे. सदरहू मिळकत आमचे अशिल यांचे खुद्द मालकीची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकत आहे. असे असताना सदर मिळकतीचे कामी अन्य कोणत्याही व्यक्तींसोबत कोणीही खरेदी-विक्री अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये तसेच सदरहू मिळकत हस्तांतरीत करणेकामी कोणत्याही प्रकारची कार्यवाही करू नये तसे करण्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. अशा परिस्थितीत सदर मिळकती संबंधी कोणीही कोणत्याही स्वरूपाचा खरेदी विक्री व्यवहार, करार, करारनामा, बंधपत्र, विकास करार इत्यादी करू नये, तसे केल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नसून आमचे अशिल संबधित व्यक्तीविरूद्ध दिवाणी अथवा फौजदारी कारवाई करतील हे या नोटीशीने कळावे.

**ठिकाण** : **पनवेल**
**तारीख** : **२६/०२/२०२६**

**सही/-**
**ॲड. सागर एन. पाटील**
**पनवेल**
**मो. ७२०८१३३७७७**

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर,**
**यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड**

दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८, ईमेल- tahasil.khalapur3@gmail.com

क्र. जन्म/रजि./एसआर ६०/२०२६/११०८

१) श्रीम. भिमी सुनिल निरगुडे
रा. शिळफाटा, ता. खालापुर, जि. रायगड — वादी

विरुध्द

१) निबंधक, जन्म - मृत्यु नोदणी अधिकारी,
मुख्याधिकारी खोपोली, ता. खालापूर,
जि. रायगड — प्रतिवादी

**विषयः- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्रीम. भिमी सुनिल निरगुडे, रा. शिळफाटा, ता. खालापुर, जि. रायगड (अपिलार्थी) यांच्या मुलाचा जन्म् श्री. प्रदिप सुनिल निरगुडे दि. २२/२/२०१९ रोजी मौजे मिळ ठाकुरवाडी, शिळफाटा, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर जन्माची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे जन्माची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वताः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि. २५/०२/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

**ठिकाण:- खालापूर**
**दिनांक : २५/०२/२०२६**

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार खालापूर**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित मालक **धरती दामोदर घरत** यांच्या हिश्शातील मालकी हक्काची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकत असून, आमचे अशिल यांनी सदर मिळकत खरेदीखत करून विकत घेण्याचे ठरविले आहे तरी सदर मिळकतींचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे जसखार, तालुका उरण, जिल्हा रायगड**

| मालमत्ता कमांक | मिळकतीचे वर्णन | घराची लांबी ×रूंदी (फुटात) | क्षेत्रफळ एकूण चौ.फुट |
|---|---|---|---|
| ५३३ ब१ | आर.सी.सी. | ३२ x ४० | १२८० |
| | | एकुण | १२८० |

प्राप्त परिस्थितीत वरील नमूद केलेल्या जमिन मिळकतींमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार,मदार,गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एमओयु वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तकारी दावे हरकती या रद्दबदल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोंकांनी नोंद घ्यावी.

**दि. २५/०२/२०२६**

**सही/-**
**ॲड. सुशांत प्र. घरत**
**बी. कॉम. एल. एल. बी.**
पत्ता :- फ्लॅट नं. ४०१ व ४०२, चौथा मजला, ओम साई बिल्डिंग, प्लॉट नं. १०१/३, गार्डन हॉटेल जवळ, सायन - पनवेल हायवेच्या बाजुला, जुना ठाणा नाका, पनवेल, जिल्हा रायगड - ४१० २०६ फोन. ९५९४९९३१४१

# नवी मुंबईत अनधिकृत बांधकामांवर हातोडा





**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने नेरूळ विभागात व कोपरखैरणे विभागात अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरुळ विभागांतर्गत युनिट नं. ०००२, प्लॉट नं. ०१५२, सेक्टर-६, सारसोळे गाव, नेरुळ, नवी मुंबई, यांचे अनधिकृतपणे बांधकाम सुरू असल्याने नेरुळ विभाग कार्यालयाकडून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आलेली होती. तथापी नोटीसीची मुदत संपुष्टात येऊनही अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविण्यात आले नसल्याने सदर अनधिकृत बांधकामांवर नेरूळ विभाग कार्यालयामार्फत २३/०२/२०२६ रोजी निष्कासन मोहिमेचे आयोजन करुन अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत युनिट्स नं ०००५,प्लॉट नं १०३४, कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये दिनांक १७-०२-२०२६ रोजी नोटीस बजावण्यात आली होती.

बांधकामावर निष्कासनाची अंशतः तोडक कार्यवाही करण्यात आली व रु २५ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

# जेएनपीएत कृषीमालाच्या निर्यातीसाठी ६,४१७ रिफर प्लग पॉइंटची व्यवस्था

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीएतुन दररोजच्या द्राक्ष, कांदा, केळी, भाजीपाल्यासह विविध प्रकारच्या सुमारे दोन हजार नाशवंत कृषीमालाच्या निर्यातीसाठी बंदर परिसरातच ६४१७ रिफर प्लग पॉइंटची व्यवस्था करण्यात आलेली आहे. यामुळे बंदरातुन नाशिवंत मालाची विनाविलंब सुरळीत निर्यात होत असल्याची माहिती जेएनपीए अधिकाऱ्यांकडून देण्यात आली. जेएनपीएचे चौथे भारत मुंबई कंटेनर टर्मिनल (बीएमसीटी) बंदर कार्यान्वित झाल्यानंतर कंटेनर मालाच्या हाताळणीला वेग आला आहे.त्यामुळे कंटेनर मालाच्या कंटेनर आयात-निर्यातीचा आकडा आतापर्यंत ८० लाखांपर्यंत पोहोचला आहे. येत्या एक दीड वर्षात जेएनपीए बंदर एक कोटी कंटेनर हाताळणीचे उद्दिष्ट गाठणार आहे.

या जेएनपीए बंदरात दरदिवशी लिक्कीड कार्गो सह सरासरी १७ जहाजे येतात.बंदरातुन वाढत्या कंटेनर हाताळणीमुळे बंदरातुन दररोजच्या द्राक्ष, कांदा, केळी व इतर फळफळावळ आणि भाजीपाल्यासह विविध प्रकारचे सुमारे दीड ते दोन हजार दरम्यान कंटेनर मालाची निर्यात केली जाते. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी १७१२ रिफर कंटेनर निर्यात झाली आहे. या नाशिवंत कृषीमालाच्या कंटेनरसाठी जेएनपीए बंदरात ६४१७ रिफर प्लग पाइंटची व्यवस्था करण्यात आली आहे.

यामध्ये एनएसएफटी-९२६,एनएसआयसीटी-७७२,एनएसआयजीसीटी-३१०, एपीएम-९८०,बीएमसीटी- ३२४०, पार्किंग प्लाझा -१३५ आदींचा समावेश आहे. तसेच विद्युत जनित्रांवरही सुमारे दोन हजार रिफर प्लग पाइंटची व्यवस्था आहे.कृषीमालाची वाहतूक सुरळीत होण्यासाठी पळस्पे ते जेएनपीए महामार्ग वातानुकूलित कंटेनर्ससाठी ग्रीन चॅनेलही उपलब्ध करून देण्यात आला आहे.

बंदरातुन होणाऱ्या कृषीमालाच्या निर्यात दरम्यान नाशिवंत मालाचे व निर्यातदार व्यापाऱ्यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेतली जात असल्याची माहिती जेएनपीएच्या कंटेनर वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

# पदपथाच्या कामाच्या गुणवत्तेच्या चौकशीची शिवसेनेची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ सेक्टर ६ परिसरात कै भारतरत्न राजीव गांधी उड्डाणपुल ते पामबीच मार्गाकडे जाणाऱ्या मार्गालगतच्या विशाल सोफा आर्ट ते नेरूळ सिव्हू सोसायटीपर्यतच्या पदपथावर सुरू असलेल्या कामाच्या गुणवत्तेची चौकशी करण्याची मागणी शिवसेनेचे महादेव पवार यांनी महापालिका आयुक्त कैलाश शिंदे यांच्याकडे एका लेखी निवेदनातून केली आहे.



नेरूळ सेक्टर ६ परिसरात कै. भारतरत्न राजीव गांधी उड्डाणपुल ते पामबीच मार्गाकडे जाणाऱ्या मार्गालगतच्या विशाल सोफा आर्ट ते नेरूळ सिव्हू सोसायटीपर्यतच्या पदपथावर सुरू असलेल्या कामाबाबत कोठेही या ठिकाणी कामाबाबतचा माहिती फलक लावण्यात आलेला नाही. वास्तविकपणे, कामाच्या ठिकाणी कामाबाबतचा माहिती फलक लावणे आवश्यक आहे. त्यामुळे पदपथावर सुरू असलेल्या कामाबाबत स्थानिक जनतेला कामाचे स्वरुप, कामाचा कालावधी, कामाचा निधी माहिती असणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे सध्या सुरू असलेल्या कामाच्या दर्जाबाबत गुणवत्तेची तपासणी पालिका प्रशासनाकडून होणे आवश्यक आहे.

पदपथावर सुरू असलेल्या नवीन कामाला आताच तडे (क्रॅक) गेले आहेत. पदपथाच्या कामासाठी कंत्राटदाराने त्या ठिकाणी ठेवलेल्या पाण्याच्या टाकीत कचरा पडला आहे. त्या ठिकाणी पाण्याची दुर्गंधी येत आहे. डासाचा त्रास स्थानिक रहिवाशांना होत आहे. साथीच्या आजाराबाबत स्थानिक रहिवाशांकडून भीती व्यक्त करण्यात येत आहे.

आपण स्वत: या ठिकाणी येवून या कामाबाबत पाहणी अभियान राबविल्यास आपणास समस्येचे गांभीर्य निदर्शनास येईल व निवेदनामागील सत्यताही आपणास समजेल. तरी आपण संबंधित अधिकाऱ्यांना त्या ठिकाणी कामाबाबतचा फलक लावण्याचे निर्देश देवून कामाची गुणवत्ता चेक करावी. तसेच पाण्याच्या टाकीच्या स्वच्छतेचे निर्देश देण्याची मागणी महादेव पवार यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

# 'हिंद-दी-चादर'साठी नवी मुंबई पालिका सज्ज




**नवी मुंबई : बातमीदार**

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमानिमित्त साधारणत: २० लाखाहून अधिक नागरिक देशापरदेशातून पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील ओवे मैदान, सेक्टर २९, खारघर या ठिकाणी २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ या दोन दिवसात येण्याचा अंदाज असून महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कोकण विभागीय आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिका सज्ज असल्याचे नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी या विषयीच्या आढावा बैठकीत सांगितले.

'हिंद-दी-चादर' अंतर्गत आरोग्य शिबिरे, स्वच्छता मोहीमा, निबंध वक्तृत्व चित्रकला अशा विविध स्पर्धा सातत्याने आयोजित करण्यात येत असून शाळा, महाविद्यालये, विविध संस्था, नागरिक यांच्या सहभागातून शहरामध्ये कार्यक्रमाची मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात आली आहे. होर्डिंग, बॅनर्स, पॅम्प्लेट्स या माध्यमातून कार्यक्रमाची माहिती सातत्याने नागरिकांपर्यंत पोहोचविली जात आहे.

या सोबतच नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने देशभरातून ठिकठिकाणाहून कार्यक्रमासाठी येणाऱ्या २ हजाराहून अधिक नागरिकांची निवास व्यवस्था अनुषांगिक सुविधांसह करण्यात आलेली आहे.

कार्यक्रम स्थळी बाह्यरुग्ण(ओपीडी) सेवा कक्ष असणार असून त्यामध्ये २५ डॉक्टर व पॅरामेडिकल स्टाफ यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे १०६ एनएमएमटी बसेस कार्यक्रमस्थळी येणाऱ्या भाविकांकरिता तैनात ठेवण्यात आलेल्या आहेत. याबाबतच्या नियंत्रणासाठी एनएमएमटी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

भाविकांच्या सोयीसाठी १००० शौचालयांची व्यवस्था करण्यात आली असून त्याठिकाणी जेटींग मशिन, सक्शन युनिट कार्यरत असणार आहेत. ओवे मैदानाचा भव्यतम परिसर लाखो नागरिकांनी फुलून जाणार असल्याने ५०० हून अधिक स्वच्छताकर्मींची व्यवस्था आवश्यक साहित्य व साधन सामुग्रीसह करण्यात आलेली आहे.

२७ फेब्रुवारी रोजी सायं. ४ वाजता सीबीडी बेलापूर येथील गुरुद्वारापासून ओवे मैदान येथील कार्यक्रम स्थळापर्यंत नगर कीर्तन या विशेष उपक्रमाचे नियोजन करण्यात आले असून यामध्येही मोठ्या प्रमाणावर नागरिकांच्या सहभागातून प्रचार प्रसिध्दी केली जाणार आहे.

या बैठकीस उपस्थित नवी मुंबई बिल्डर्स असोसिएशनचे पदाधिकारी तसेच एपीएमसी मार्केट व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते. हा कार्यक्रम समाजमूल्ये जपणारा व सामाजिक एकात्मतेची भावना रुजविणारा असल्याने या कार्यक्रमाच्या आयोजनात विविध खाद्यपदार्थ, पिण्याचे पाणी तसेच अन्नधान्य पुरवठ्यासाठी मोठ्या प्रमाणात सहकार्य करावे असे आवाहन यावेळी आयुक्तांनी केले.



# खासदार बारणेंकडून महापौर नितीन पाटील यांना शुभेच्छा

**पनवेल :** महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी पदभार स्वीकारल्यानंतर मावळचे खासदार श्रीरंग बारणे हे प्रथमच पनवेलमध्ये आले. यावेळी महापौरांनी त्यांची सदिच्छा भेट घेतली. खासदार श्रीरंग बारणे यांनी महापौरांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी उरण जिल्हा प्रमुख विनोद साबळे, उपजिल्हा प्रमुख परेश पाटील, महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, तालुका प्रमुख रघुनाथ पाटील, उपमहानगर प्रमुख महेश सावंत, शिवसेना उपमहानगर प्रमुख सचिन मोरे, उपमहानगर समन्वयक राहुल गोगटे, शहर प्रमुख प्रसाद सोनावणे, शहर संघटक अभिजित साखरे, संपर्क प्रमुख राजेंद्र यादव, नवीन पनवेल शहर प्रमुख अतुल मोकल, खारघर शहर प्रमुख प्रसाद परब, शाखा प्रमुख मंदार काणे आदी उपस्थित होते.

# रमजाननिमित्त फळांना मागणी वाढली

**उरण : बातमीदार**

सध्या सुरू असलेल्या रमजाननिमित्त उरण बाजारपेठेत फळांना मागणी वाढली आहे. रमजान महिन्यात मुस्लिम धर्मीय (रोजा) उपवास पकडतात आणि सायंकाळी फळांचे सेवन करून इफ्तारी करतात. त्यामुळे या दिवसात फळांची मागणी वाढत असते. यंदा गुरुवारपासून रमजान मासाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे उरण शहरातील बाजारपेठेत फळांची मागणी वाढण्याचे आवकदेखील वाढली आहे.



रमजान महिन्यात उपवास करताना मुस्लिम धर्मीय दिवसभर पाण्याचा एकही थेंब न पिता उपवास करतात आणि सायंकाळी इफ्तार करुन उपवास सोडला जातो. उपवास सोडताना यात रसाळ फळे अधिक असतात. त्यामुळे या दिवसात कलिंगड, आंबा, पपई, खरबूज, अननस, चिकू, द्राक्षे, संत्र अशा रसाळ फळांना अधिक मागणी असते. त्यामुळे रमजान सणानिमित्त उरण बाजारपेठेत उलाढालही वाढते. उरण बाजारपेठेतील सध्या रसाळ फळांचे दर कलिंगड ४० रु. प्रतिकिलो, चिकू १२० रु. किलो, द्राक्षे १२० रु. किलो, अननस १४० रु. किलो, पपई ७० रु. किलो,' खरबूज ५० रु. किलो, संत्रे १४० रु. किलो, आंबा ३०० रु. किलो याप्रमाणे असून रमजाननिमित्त या फळांना नागरिकांकडून मोठी मागणी आहे.

उरणमध्ये मुस्लिम धर्मीय बांधव मोठ्या प्रमाणात उपवास पकडतात त्यामुळे रमजान मध्ये फळाना मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे.

दरम्यान, उन्हाळ्यामध्ये शरीरात पाण्याची कमतरता जाणवते. ही कमी भरून काढण्याचे काम फळांच्या सेवनाने होते.

# ट्रेलरमधून डिझेलची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातील महामार्गावर उभ्या केलेल्या ट्रेलरमधून तब्बल अडीचशे लिटर डिझेलची चोरी झाली. ही घटना कळंबोली सर्कल ते जेएनपीटी महामार्गावर घडली.

पनवेल जेएनपीटी महामार्ग तसेच मुंबईपुणे द्रुतगती महामार्गालगत अनेक ट्रेलर आणि ट्रक चालक रात्रीच्या वेळी विश्रांतीसाठी आपली वाहने उभी करतात, मात्र वारंवार महामार्गावर डिझेल चोरीचे प्रकार घडू लागल्याने पोलिसांसमोर आव्हान उभे राहिले आहे. या प्रकरणी २९ वर्षीय ट्रेलर चालक राजकुमार यादव यांनी कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, यादव यांनी कळंबोली सर्कलवरून जेएनपीटीकडे जाणाऱ्या सेवा रस्त्यावर त्यांचा ट्रेलर विश्रांतीसाठी उभा केला होता.

पहाटे सुमारे पावणे पाच वाजण्याच्या सुमारास तीन अनोळखी व्यक्तींनी ट्रेलरच्या टाकीचे डिझेल कुलूप तोडून त्यामधील अंदाजे २५० लिटर डिझेलची चोरी केली. या प्रकरणी २२,५०० रुपयांचे डिझेल चोरीला गेल्याची नोंद कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली.

# नागाव समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम

**उरण : वार्ताहर**

सद्गुरू बाबा हरदेव सिंह यांच्या वाढदिवसानिमित्त संत निरंकारी मिशन उरण यांच्या माध्यमातून रविवार (दि.२२) उरण तालुक्यातील नागाव समुद्रकिनारी भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या उपक्रमात ६०० स्वयंसेवकांनी उत्स्फुर्त सहभाग सहभागी झाले होते. पिरवाडी समुद्रकिनारपट्टी स्वच्छ केली. देशभरात रविवारी 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानांतर्गत जवळपास दोन हजार ठिकाणी जलाशय सफाई मोहीम हाती घेण्यात आली. त्याचाच एक भाग म्हणून उरणमधील नागाव समुद्रकिनारा येथे मोठ्या प्रमाणावर स्वच्छता अभियान पार पडले.



मोहिमेदरम्यान प्लास्टिक, काच, थर्माकोल व इतर घनकचऱ्याचा ६०० बॅगा गोळा करण्यात आला. ही मोहीम संत निरंकारी मिशन अंतर्गत, संत निरंकारी चारिटेबल फाऊंडेशन यांच्या आयोजनातून, सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिताजी यांच्या प्रेरणेने पार पडली. या मोहिमेत संत निरंकारी मिशन सेक्टर संयोजक दत्ता पाटील, मुखी अनंत शेनॉय, संत निरंकारी सेवा दल आदींनी सहकार्य केले.

# महिला दिनानिमित्त नवी मुंबई पालिकेमार्फत विविध स्पर्धा, कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक महिला दिनानिमित्त ८ मार्च २०२६ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत महापालिका क्षेत्रातील विविध क्षेत्रात कार्यरत महिलांना पुरस्कार वितरण तसेच महिला, मुली, महिला बचत गट, महिला मंडळ, महिला संस्था यांनी उत्पादित केलेल्या साहीत्याची विक्री करण्यासाठी विनामूल्य स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

यामध्ये नमुंमपा कार्यक्षेत्रातील महिलांकरीता दि. ०४ मार्च २०२६ ते दि. ०६ मार्च २०२६ या कालावधीत समुह गायन स्पर्धा, महिला भजनी मंडळ भजन स्पर्धा, लहान व्हिडीओ स्पर्धा - (विषय : महिला सुरक्षितता विषयक जनजागृती, पर्यावरण, शिक्षण), समुह नृत्य स्पर्धा (विषय - कोळीनृत्य), समुह नाटिका स्पर्धा आणि मंगळागौर स्पर्धा अशा ६ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धांची प्राथमिक फेरी व अंतिम फेरी महात्मा फुले स्मृती भवन, भूखंड क्र.१२/१३, तिसरा मजला, सेक्टर-३, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी घेण्यात येईल.

तसेच दि. ८ मार्च, २०२६ रोजी जागतिक महिला दिन कार्यक्रमाच्या दिवशी या स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा तसेच पुरस्कार वितरण समारंभ विष्णुदास भावे नाटयगृह, वाशी या ठिकाणी होणार आहे. या स्पर्धांमधील सहभाग, पुरस्कारासाठीची नामांकने व वस्तु विक्री स्टॉल करिता आवश्यक अर्ज सर्व विभाग कार्यालये तसेच समाजविकास विभाग, नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, पहिला मजला, से. ११, सी.बी.डी., बेलापूर येथे उपलब्ध आहेत.

या स्पर्धांमधील सहभागाकरीता अर्ज करण्याचा अंतिम दि. ०२ मार्च २०२६ असून पुरस्कार व वस्तु विक्री स्टॉल



करीता अर्ज करण्याचा अंतिम ४ मार्च २०२६ असणार आहे. विशेष आकर्षण म्हणजे दि. ८ मार्च, २०२६ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित महिलांकरीता 'पैठणी लकी ड्रॉ' स्पर्धा कार्यक्रमाचे ठिकाणी घेण्यात येणार आहे.

पुरस्कार नामांकन व विक्री स्टॉल बाबतची सविस्तर माहिती, अर्ज, नियम, अटी व शर्ती महानगरपालिकेची सर्व विभाग कार्यालये तसेच समाजविकास विभाग, नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, पहिला मजला, से. ११, सी.बी.डी., बेलापूर येथे शासकीय सुट्टया वगळून इतर दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील तसेच अर्जही स्विकारले जातील.

विक्री स्टॉलसाठी फक्त नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या महिला, मुली, महिला बचत गट, महिला मंडळ, महिला संस्था अर्ज करु शकतात. दाखल केलेल्या अर्जांपैकी एक अथवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार नमुंमपा आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांनी राखून ठेवला आहे याची नोंद घेण्यात यावी.

# एआय समिटमधील गोंधळाचे पडसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

राजधानी दिल्ली येथील भारत मंडपम येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय ए आय समिट २०२६ दरम्यान झालेल्या गोंधळाचे पडसाद रायगड जिल्ह्यात उमटले असून अलिबाग येथे भाजप महिला मोर्चाच्या वतीने काँग्रेसविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात आले. युथ काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी समिटदरम्यान शर्ट काढून निदर्शने केल्याच्या घटनेचा निषेध करत, देशाची आंतरराष्ट्रीय प्रतिमा मलिन केल्याचा आरोप करण्यात आला.

भाजप महिला मोर्चाच्या जिल्हा अध्यक्षा चित्रा पाटील यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी अलिबाग-मांडवा मार्गावर रस्ता रोको आंदोलन केले. यावेळी काँग्रेसचा निषेध असो, देशविरोधी कृत्यांचा बंद करा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.



◆ अलिबागमध्ये भाजप महिला मोर्चाचे रस्ता रोको आंदोलन

चित्रा पाटील यांनी सांगितले की, ५० हून अधिक देशांचे प्रतिनिधी, जागतिक कंपन्या आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज उपस्थित असताना अशा प्रकारचे विवस्त्र किंवा आक्रमक आंदोलन करणे हे देशाच्या प्रतिष्ठेला धक्का देणारे आहे. भारत जागतिक स्तरावर तंत्रज्ञान नेतृत्वाच्या दिशेने वाटचाल करत असताना अशा घटना दुर्दैवी असल्याचे त्यांनी नमूद केले.

भाजप कार्यकर्त्यांनी राहुल गांधी तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांच्यावर जोरदार टीका केली. भारत-अमेरिका व्यापार कराराच्या विरोधात करण्यात आलेले आंदोलन हे राजकीय स्वार्थातून प्रेरित असून त्याचा देशाच्या विकासाशी संबंध नसल्याचा आरोप करण्यात आला. राष्ट्रीय महत्त्वाच्या कार्यक्रमात राजकारण आणणे योग्य नसल्याचेही त्यांनी म्हटले.

या आंदोलनात ज्येष्ठ नेत्या मंजूषा कुद्रमोती, पंचायत समिती सदस्या प्रियदर्शनी पाटील, मंदा बळी तसेच भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या मोठ्या संख्येने कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या.भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, राजकारण हे तात्पुरते असते; मात्र तंत्रज्ञानातील प्रगती ही पुढील अनेक पिढ्यांच्या भविष्याशी संबंधित असते. अशा कार्यक्रमात गोंधळ घालणे म्हणजे देशहिताला बाधा पोहोचवणे होय, अशी तीव्र प्रतिक्रिया आंदोलनादरम्यान व्यक्त करण्यात आली.

## मुरुड पंचायत समिती कर्मचारी वृंदांचे आंदोलन

**मुरुड : प्रतिनीधी**

जय महाराष्ट्र शासकीय निम शासकीय अधिकारी कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेचे अध्यक्ष अशोक डहाळे यांच्या अध्यक्षतेखाली मुरुड पंचायत समिती कार्यालयासमोर लिपिकवर्गीय कर्मचारी यांनी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. या कामबंद आंदोलनामुळे ग्रामीण भागातील जनतेची कामे अडकली असून लोक हैराण झाले आहे. गेली अनेक वर्ष कर्मचारी वृंद आपल्या न्यायिक मागण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करून सुद्धा लक्ष देत नसल्याने अखेर सर्व कर्मचारी यांनी काम बंद आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. मुरुड पंचायत समिती मधील उमेश पाटील, सपना राणे , करण माने , विनोद भारमळ, दीपक जाधव, शुभांगी साळगावकर , रेखा चोगले आदी सह असंख्य कर्मचारी काम बंद आंदोलनात सहभागी झाले आहेत.



## अरविंद मालखेडे यांनी पदभार स्वीकारला

**रोहे : प्रतिनिधी**

अरविंद मालखेडे यांनी मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य परिचालन व्यवस्थापक म्हणून पदभार स्वीकारला आहे. त्यांनी रेल्वे बोर्डात प्रधान कार्यकारी संचालक (पायाभूत सुविधा) म्हणून रुजू होणाऱ्या एस एस गुप्ता यांच्याकडून पदभार स्वीकारला.



श्री मालखेडे हे १९९१ च्या बॅचचे आयआरटीएस अधिकारी आहेत. त्यांनी २०२४-२०२६ दरम्यान मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य वाणिज्य व्यवस्थापक; २०२२ ते २०२४ दरम्यान दक्षिण मध्य रेल्वेचे वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक आणि २०१९ ते २०२२ दरम्यान दक्षिण पश्चिम रेल्वेचे हुबळी विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) यासह अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे.

त्यांनी २०१५ ते २०१९ या काळात आयआरसीटीसीमध्ये पश्चिम विभागाचे ग्रुप महाव्यवस्थापक म्हणून प्रतिनियुक्तीवर काम केले आहे. १९९९-२००४ दरम्यान त्यांनी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील कॉन्कर मध्ये इनलँड कंटेनर डेपो येथे स्थापित केलेल्या प्रतिनियुक्तीवर होते तसेच आयसीडी नागपूरचेही ते प्रमुख होते.मुंबईतील रस्त्यावरील मुलांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांसोबत ते सामाजिक कार्यात जवळून सहभागी आहेत.

## आयुष्यमान डिजिटल मिशन अंतर्गत जिल्हा रुग्णालय राज्यात द्वितीय

**अलिबाग : प्रतिनिधी**

आयुष्यमान डिजिटल मिशन अंतर्गत रायगड जिल्हा रुग्णालयाने द्वितीय क्रमांक मिळवित राज्यस्तरीय सन्मान प्राप्त केला आहे. त्याचप्रमाणे महाड ग्रामीण रुग्णालयाचे काम जिल्ह्यात पहिल्यास्थानी आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर व राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते मुंबई येथे रविवारी ता.२२ वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.



रायगड जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, अतिरिक जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी, मेट्रेन गायत्री म्हात्रे यांच्यासह जिल्हा रुग्णालयाचे परिचारिका, डॉक्टर यांनी पुरस्कार स्वीकारला. राज्याच्या आरोग्य विभागातर्फे आयुष्यमान डिजिटल मिशन सुरू केले होते. जिल्हा रुग्णालयाने यंत्रणा कार्यान्वित केली होती. त्यामुळे रुग्णाच्या आरोग्याची माहिती एका क्लिकवर उपलब्ध झाली आहे. महाड ग्रामीण रुग्णालयालाही पुरस्कार प्राप्त झाला आहे. ओपीडी, आयपीडी, प्रसूती, शस्त्रक्रिया, चाइल्ड केअर, प्रसूतीनंतर केलेली गरोदर माता आणि बालकांची कांची काळजी रुग्णालयातर्फे घेतली गेली होती. त्यामुळे महाड ग्रामीण रुग्णालयाला जिल्ह्यातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देण्यात आला आहे.

नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. नितीन गुरव यांना ग्रामीण भागातील जनतेला राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत दर्जेदार आरोग्य सेवा दिल्याबद्दल तसेच सन २०२४-२५या वर्षात उल्लेखनिय कामगिरी करीत सर्वात जास्त मानधन मिळविणा-या पनवेल येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवलीमधील कोळखे उपकेंद्र अंतर्गत विचुंबे गावातील आशा स्वयंसेविका अर्चना भोईर यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

## कोकणकन्या आणि मांडवी एक्सप्रेसला अतिरिक्त तृतीय वातानुकूलित कोच

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे यापुढे कोकणात प्रवास करणाऱ्या प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता मुंबई- मडगांव कोकणकन्या एक्सप्रेस आणि मांडवी एक्सप्रेस कायमस्वरूपी १ अतिरिक्त तृतीय वातानुकूलित इकॉनॉमी कोचसह चालविण्यात येणार आहे. हा गाडीतील बदल दिनांक २४/२५ फेब्रुवारी २०२६ पासून लागू होईल.

दिनांक २४/२५ एप्रिल २०२६ पासून मुंबई- सिकंदराबाद दुरांतो एक्सप्रेस आता सुधारित संरचनेसह पूर्णपणे वातानुकूलित गाडी म्हणून चालविण्यात येईल.

(अ) मुंबई- मडगांव कोकणकन्या एक्सप्रेस आणि मांडवी एक्सप्रेसची सुधारित संरचना: ट्रेन क्रमांक २०१११/२०११२ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- मडगांव - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस कोकणकन्या एक्सप्रेस आणि ट्रेन क्रमांक १०१०३/१०१०४ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- मडगांव - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मांडवी एक्सप्रेस : १ प्रथम वातानुकूलित सह वातानुकूलित द्वितीय, १ वातानुकूलित द्वितीय, ४ वातानुकूलित तृतीय, ३ वातानुकूलित तृतीय इकॉनॉमी,* ७ शयनयान, ४ सामान्य द्वितीय, १ पॅन्ट्री कार, १ जनरेटर कार आणि १ द्वितीय बैठक आणि सामानासह गार्ड ब्रेक व्हॅन (२३ एलएचबी कोच) ट्रेन क्रमांक २०१११ दिनांक २५.०२.२०२६ पासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- मडगांव कोकणकन्या एक्सप्रेस सुधारित संरचनेसह चालविण्यात येईल .

## गो. म. वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयास स्काफ अंतर्गत ए+ श्रेणी

**तळा : प्रतिनिधी**

श्री गो म वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयास शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा अंतर्गत बाह्य मूल्यांकनात ए + श्रेणी प्राप्त करून राज्यातील गुणवत्तापूर्ण शैक्षणिक संस्थेमध्ये शाळेने आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे येथे राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आली होती. त्यानुसार सन २०२४- २०२५ मध्ये राज्यातील १,०२६७५ शाळांनी स्वयं मूल्यांकन पूर्ण केले. स्वयं मूल्यांकनात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या शाळापैकी सन २०२५-२०२६ मध्ये १०,७७२ शाळांची बाह्य मूल्यांकनासाठी



निवड करण्यात आली होती त्यापैकी १०,६४४ शाळांचे बाह्य मूल्यांकन पूर्ण झाले. या प्रक्रियेत राज्यातील ४२९ शाळा व रायगड जिल्ह्यातील १० शाळांना ए+ श्रेणी प्राप्त झाली असून त्यामध्ये गो म वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय जिल्ह्यातील शैक्षणिक दृष्ट्या नामवंत शाळा ठरली आहे. गो म वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातील सुसज्ज ग्रंथालय, संगणक कक्ष, विद्यार्थ्यांना पिण्यासाठी आरओचे पाणी, स्मार्ट बोर्डद्वारे अध्यापन, विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम, तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन, विविध सराव परीक्षांचे आयोजन, विविध परीक्षेसंबंधी समुपदेशन यासारखे उपक्रम यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जात आहे.

या उपक्रमांचे फलित म्हणून अनेक विद्यार्थ्यांनी दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शैक्षणिक क्षेत्रातच नाही तर कला, क्रीडा, विज्ञान प्रदर्शन, निबंध, वक्तृत्व आणि सांस्कृतिक स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी जिल्हा व राज्यस्तरावर उल्लेखनीय यश मिळवले आहे. व्यक्तिमत्त्व विकास, नैतिक शिक्षण आणि पर्यावरण जनजागृती यांसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण झाली आहे.

चांगला शिक्षक वर्ग व गुणवत्ता पूर्ण शैक्षणिक वातावरण यामुळेच गो म वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयास ए + श्रेणी प्राप्त झाली आहे. या यशाबद्दल गटविकास अधिकारी महादेव शिंदे, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, विश्वस्त अनंत जोशी, नंदकुमार वेदक, मारुती शिर्के, अध्यक्ष मंगेश देशमुख, व संस्थेचे पदाधिकारी मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, पर्यवेक्षक महादेव लोकरे, अभिनंदन केले आहे.

## पोलादपूरमध्ये क्षत्रिय कदम घराण्याचे आठवे राज्यस्तरीय कुलसंमेलन उत्साहात

**माणगाव : बातमीदार**

महाराष्ट्रभर विखुरलेल्या कदम घराण्याचे आठवे राज्यस्तरीय वार्षिक कुलसंमेलन पोलादपूर तालुक्यातील वडघर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत जल्लोषात झाले.

महाराष्ट्राची तसेच कदम घराण्याची कुलस्वामिनी तुळजाभवानीच्या जागरण गोंधळाने कुलसंमेलनात भक्तिमय वातावरण तयार झाले होते. यानंतर प्राचीन कदंब राजवंशाचे ध्वजारोहण अध्यक्ष अमरराजे कदम यांच्या हस्ते तर पवित्र कदंब वृक्ष पूजन माऊलीशेठ कदम पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी व्याख्याते प्रविण कदम यांनी प्राचीन कदंब राजवटीबद्दल सविस्तर माहिती उपस्थित कदम बंधूंसमोर मांडली. छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध उद्योजक मनोज कदम यांनी उद्योग व्यवसायात कदमांनी अग्रेसर राहावे याबाबत उपयुक्त मार्गदर्शन केले. क्षत्रिय मराठा कदम परिवार



अध्यक्ष अमरराजे कदम आणि डॉ.सदानंद गावडे यांनी कदम घराण्याचा कुलधर्म, कुलाचार याविषयी प्रबोधन केले.

वडघर गावचे सुपुत्र उद्योजक रामचंद्र रावजी कदम यांच्या चरित्रपर माणगाव येथील इतिहास अभ्यासक रामजी कदम यांनी लिहिलेल्या शून्य ते शिखर या पुस्तकाचे प्रकाशन रत्नागिरी जिल्हा परिषद सदस्य अरूण अण्णा कदम यांच्या शुभहस्ते करण्यात आले.तसेच महाराष्ट्रभरातील कदम घराण्यातील खेळाडू , उद्योजक, पुरस्कारप्राप्त शेतकरी , सनदी लेखापाल, इंजिनिअर अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असलेल्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. गोवा आणि महाराष्ट्रातील नांदेड, बीड, नगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, धाराशीव, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मुंबई, हिंगोली आणि गोवा येथील कदम बंधूंनाही सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

क्षत्रिय मराठा कदम कुलसंमेलनाप्रसंगी रत्नागिरी जिल्हा परिषद सदस्य अरूण अण्णा कदम, दापोलीचे माजी आमदार संजयराव कदम, वैद्यकीय मदत कक्षाचे कृष्णा कदम, साप्ताहिक धन्यवाद संपादक शंकरराव कदम, कॅप्टन श्रीपतराव कदम, कोकण इतिहास परिषद सदस्य प्रवीण कदम, डॉ.सदानंद गावडे , मुख्य सल्लागार माऊलीशेठ कदम पाटील, सरचिटणीस रामजी कदम , उपाध्यक्ष दादासाहेब कदम उपस्थित होते.

## 'भुरी'मुळे आंबा काळवंडणार! हवामानातील बदलामुळे आंबा, काजू मोहरावर कीड

**माणगाव :** हवामानातील सततचे चढ-उतार, पहाटेचे दाट धुके आणि दिवसाच्या तापमानातील अचानक वाढ यामुळे माणगाव तालुक्यातील आंबा बागायतदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यात सुमारे ७०९ हेक्टर क्षेत्रावर आंबा बागायती असून, संपूर्ण रायगड जिल्हा मध्ये जवळपास ९,७७५ हेक्टर क्षेत्र आंबा उत्पादनाखाली आहे. सध्या बहुतांश बागांमध्ये मोहर बहरात असून काही ठिकाणी लहान फळधारणा सुरू झाली आहे. मात्र बदलत्या हवामानामुळे मोहरावर कीडरोगांचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे.मावा आणि भुरीचा वाढता प्रादुर्भाव गेल्या काही दिवसांपासून सकाळ-संध्याकाळ दाट धुके आणि वातावरणातील आर्द्रता वाढल्याने आंबा पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. मावा किडीमुळे फुलोऱ्यावर चिकट थर तयार होतो आणि त्यातून बुरशीजन्य रोगांचा प्रसार वेगाने होतो. परिणामी मोहर कोमेजतो, गळतो आणि फळधारणा कमी होते. याचबरोबर भुरी (झुवशी चळश्रवशु) रोगाचा प्रादुर्भावही वाढत आहे. भुरीमुळे मोहर आणि कोवळी फळे काळवंडून वाळू लागतात. त्यामुळे उत्पादनात मोठी घट येण्याची भीती बागायतदार व्यक्त करत आहेत. काही बागांमध्ये मोहर पूर्णपणे करपल्याची उदाहरणेही पुढे येत आहेत. तज्ज्ञांचे मार्गदर्शन; तातडीने फवारणीचे आवाहन या पार्श्वभूमीवर माणगाव कृषी विभागाने शेतकऱ्यांना वेळेत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. नुकसानीच्या भरपाईची वाट न पाहता मोहराचे संरक्षण करण्यासाठी नियोजनबद्ध फवारणी करावी, असे कृषी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. उत्पादनावर परिणामाची भीती शेतकऱ्यातून बोलताना व्यक्त होत असून माणगाव तालुक्यातील आंबा हे शेतकऱ्यांचे प्रमुख नगदी पीक मानले जाते.



## द.ग.तटकरे महाविद्यालयात गुरु तेग बहादूर शहीदी समागम

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हिंद दी चादर या संकल्पनेवर आधारित श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त भावपूर्ण समूहगान कार्यक्रम झाला. त्याचबरोबर राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंतीही उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.



गुरु तेग बहादूर साहिबजी हे धार्मिक स्वातंत्र्य, मानवता आणि त्यागाचे तेजस्वी प्रतीक मानले जातात. अन्याय आणि धार्मिक असहिष्णुतेविरुद्ध उभे राहत त्यांनी दिलेले बलिदान आजही समाजाला सत्य, न्याय आणि मानवतेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देते. ३५० वा शहीदी समागम हा केवळ स्मरणदिन नसून धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवाधिकारांच्या जपणुकीचा संकल्प दिवस आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. एम.खामकर होते. त्यांनी गुरु तेग बहादूर यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकत, शीख संप्रदायाचे नववे गुरु म्हणून त्यांचे कार्य, त्यांना लाभलेली हिंद की चादर ही उपाधी आणि त्यांच्या अद्वितीय त्यागाची माहिती विद्यार्थ्यांना दिली.उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य यांनी शीख धर्मग्रंथातील त्यांच्या रचनांचा उल्लेख करत धार्मिक सहिष्णुता आणि मानवाधिकारांसाठी त्यांनी प्राणार्पण केल्याचे सांगितले. धर्म हा माणसाला जोडणारा असावा, तोडणारा नव्हे, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंतीनिमित्त मार्गदर्शन करताना प्राचार्यांनी स्वच्छता हीच सेवा, देव शोधू नका, तो माणसातच पहा या त्यांच्या शिकवणीची आठवण करून दिली

## हिरकणी कक्ष तयार करण्यासाठी निविदा सादर कराव्यात

**अलिबाग :** जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी रायगड, अलिबाग हे जिल्हा व तालुकास्तरावर शासकीय कार्यालये व इमारतीमध्ये महिलांकरिता स्तनपानासाठी बंधिस्त कक्ष (हिरकणी कक्ष) तयार करण्यासाठी नामांकित उत्पादक, निर्माते कंपन्या, पुरवठादार, नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून ई-निविदाव्दारे दरनिश्चिती करुन दरकरार करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने निविदा मागविण्यात येत असून इच्छूक नामांकित उत्पादक, निर्माते कंपन्या, पुरवठादार, नोंदणीकृत कंत्राटदारांनी निविदा सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीकांत हावळे यांनी केले आहे. या निविदेबाबतची विस्तृत माहिती https://mahatenders.gov.in, या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# इंग्लंडची सेमी फायनलमध्ये एन्ट्री!

## हॅरी ब्रूकचे वादळी शतक

**पल्लेकेले : वृत्तसंस्था**

विश्वचषक स्पर्धेच्या सुपर-८ सामन्यात इंग्लंडने पाकिस्तानला हरवून उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला आहे. पल्लेकेले येथे खेळल्या गेलेल्या रोमांचक सामन्यात इंग्लंडने शेवटच्या षटकात दोन विकेट्सने विजय मिळवला. या विजयाने इंग्लंडला उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित झाला, तर पाकिस्तानचा स्पर्धेतून बाहेर पडण्याचा धोका आता वाढला आहे.

पाकिस्तानच्या १६५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात खराब झाली. पॉवरप्लेमध्ये त्यांनी तीन प्रमुख विकेट्स गमावल्या. कर्णधार हॅरी ब्रूक आणि विल जॅक्स यांच्यातील भागीदारीने संघाला विजय मिळवून दिला. ब्रूक ५१ चेंडूत १०० धावा करून बाद झाला. हे त्याच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिला शतक होते. यानंतर इंग्लंडला आणखी दोन धक्के सहन करावे



लागले, परंतु शेवटी त्यांनी स्वतःचे स्थान राखण्यात यश मिळवले. इंग्लंडने १६५ धावांचे लक्ष्य पाच चेंडू शिल्लक असताना पूर्ण केले आणि उपांत्य फेरीत प्रवेश केला.

या सामन्यात पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता.

सॅम अयुब आणि साहिबजादा फरहान यांनी पहिल्या विकेटसाठी फक्त १४ धावा जोडल्या. सॅम अयुब ७ चेंडूत ७ धावा काढून बाद झाला. त्यानंतर कर्णधार सलमान अली आगा ६ चेंडूत ५ धावा काढून बाद झाला. त्यानंतर बाबर आझम आणि फखर जमान यांनी प्रत्येकी २५ धावांची खेळी केली. बाबरने २४ चेंडूत इतक्या धावा केल्या, तर फखरने १६ चेंडूंचा सामना केला. त्यानंतर शादाब खानने ११ चेंडूत २३ धावांची खेळी केली. उर्वरित पाकिस्तानी फलंदाज एकेरी अंकात बाद झाले.

इंग्लंडकडून लियाम डॉसनने सर्वाधिक तीन बळी घेतले. जेमी ओव्हरटन आणि जोफ्रा आर्चरने प्रत्येकी दोन बळी घेतले. टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत इंग्लंडने प्रवेश करण्याची ही सलग पाचवी वेळ आहे. इंग्लंडने २०१६, २०२१, २०२२, २०२४ आणि आता २०२६मध्ये टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

# नेट रन रेट सुधारण्यासाठी टीम इंडियाला करावा लागणार चमत्कार

**चेन्नई : वृत्तसंस्था**

२०२६ च्या टी-२० विश्वचषकाच्या गट टप्प्यात टीम इंडियानं शानदार कामगिरी केली. या विश्वचषकात, भारतीय क्रिकेट संघानं त्यांचे चारही गट टप्प्यातील सामने जिंकले, मात्र सुपर-८ मध्ये पोहोचल्यानंतर, त्यांना त्यांच्या पहिल्याच सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ७६ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. या पराभवामुळं टीम इंडियाला दोन धक्के बसले. पहिलं, त्यांना दोन गुण गमवावे लागले आणि दुसरं म्हणजे त्यांचा नेट रन रेट उणे ३.८०० पर्यंत घसरला. आता, सेमीफायनलमध्ये पोहोचण्यासाठी आणि त्यांचा नेट रन रेट सुधारण्यासाठी टीम इंडियाला कठोर परिश्रम करावे लागतील.



सुपर-८ मध्ये टीम इंडियाचा पुढील सामना झिम्बाब्वेविरुद्ध असेल. हा सामना २६ फेब्रुवारी रोजी चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर खेळला जाईल. या सामन्यापूर्वी, सेमीफायनलमध्ये पोहचण्यासाठी आणि त्यांचा नेट रन रेट सुधारण्यासाठी भारताला काय करावे लागेल, असा प्रश्न चाहत्यांच्या मनात उपस्थित होत आहे.

टीम इंडियाला नेट रन रेटवर अवलंबून राहण्यापूर्वी गुण मिळवण्यावर लक्ष केंद्रित करावं लागेल. सेमीफायनलमध्ये पोहोचण्यासाठी त्यांना प्रथम दोन्ही सामने जिंकावे लागतील. टीम इंडियाकडे सध्या एकही गुण नाही. त्यामुळं सेमीफायनलमध्ये पोहोचण्यासाठी भारताला त्यांचे उर्वरित दोन्ही सामने जिंकावे लागतील.

# भारताच्या फलंदाजी नियोजनाबाबत फेरविचार?


**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत अव्वल आठ फेरीच्या पहिल्याच सामन्यात दक्षिण आफ्रिकेकडून दारुण पराभव पत्करावा लागल्यानंतर आता फलंदाज, फलंदाजीचा क्रम आणि डावखुर्या फलंदाजांचे नियोजन अशा सर्वच आघाड्यांवर संघ व्यवस्थापन फेरविचार करत असल्याची चर्चा आहे.

सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन दोएशहाते आणि फलंदाजी प्रशिक्षक सितांशू कोटक यांनी तसे संकेतच दिले आहेत. तीन सामन्यांत अपयशी ठरलेल्या अभिषेक शर्मा, तिलक वर्मा यांच्यापैकी एकावर गच्छंतीची वेळ येऊ शकते. त्याचबरोबर रिंकू सिंहचेही स्थान धोक्यात येण्याची शक्यता असल्याचे समजते.

एका पराभवाने बसलेल्या जोरदार झटक्यानंतर संघात बदल तर अपेक्षित आहेत, मात्र ते कसे आणि काय करायचे याबाबत संघ व्यवस्थापन विचार करत असल्याचे फलंदाजी प्रशिक्षक कोटक यांनी सांगितले. अर्थात, नियोजन आहे तेच ठेवावे की बदलावे यावर अजून व्यवस्थापनात एकमत नाही. आम्ही विचार करत

### अभिषेक, तिलकपैकी एकाला वगळण्याचे प्रशिक्षकांचे संकेत



असल्याचे कोटक यांनी स्पष्ट केले.

सहाय्यक प्रशिक्षक दोएशहाते यांनी मात्र थेट विधान करताना फलंदाजीतील अपयश लक्षात घेता ते भरून काढणारा एकही फलंदाज राखीव खेळाडूंत नाही याची कबुलीच दिली. आघाडीच्या फळीतील डावखुऱ्या फलंदाजांचे नियोजनदेखील सुधारण्याची गरज आहे. यासाठी पुन्हा एकदा संजू सॅमसनचा विचार होऊ शकतो. सलामीला डाव्या-उजव्या हाताने फलंदाजी करणारी जोडी यशस्वी ठरू शकते, असे दोएशहाते यांनी थेट सांगितले.

> *सातत्यपूर्ण अपयशानंतर संघात दोन दिवसांत बदल होऊ शकत नाहीत. अपयशावर काम करण्यासाठी किमान पंधरा दिवसांचा तरी कालावधी आवश्यक आहे. हा माझा प्रशिक्षण अनुभव आहे, मात्र सध्या आमच्याकडे इतका कालावधी नाही. मैदानात उतरल्यावर चेंडू पाहणे आणि त्याच्या दर्जानुसार खेळणे हेच नियोजन आवश्यक आहे.*
>
> **-सितांशू कोटक,** फलंदाजी प्रशिक्षक

**'उपलब्ध पर्याय तपासणार'**

भारताच्या फलंदाजीतील अपयशात सर्वाधिक चर्चा अभिषेक आणि तिलक यांच्याबाबतच होत आहे. विश्वचषक स्पर्धेदरम्यानच अभिषेकला अन्नातून विषबाधा झाली. त्यानंतर लागोपाठ तीन वेळा शून्यावर बाद झाल्याने त्याच्यावर दडपण आले असावे, असे सांगून सहाय्यक प्रशिक्षक दोएशहाते यांनी उपलब्ध परिस्थितीत पर्याय शोधून काम करणे इतकेच हाती असल्याचे म्हटले.

# भारताची आज झिम्बाब्वेशी दुसरी सुपर-८ लढत; मोठा विजय अनिवार्य

**चेन्नई : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकातील उपांत्य फेरीचा मार्ग भारतीय संघासाठी अधिकाधिक कठीण होत चालला आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ७६ धावांनी झालेल्या पराभवामुळे टीम इंडियाचा नेट रन रेट -३, ८००वर पोहचला आहे. भारताला आता ग्रुप १मध्ये झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिजविरुद्ध दोन महत्त्वाचे सामने खेळावे लागतील. सेमी फायनलमध्ये स्थान निश्चित करण्यासाठी संघाला दोन्ही सामने जिंकावे लागतील आणि त्यांचा नेट रन रेट लक्षणीयरीत्या सुधारावा लागेल. टीम इंडियाचा सुपर-८ फेरीतील पुढील दुसरा सामना गुरुवारी (दि. २६) झिम्बाब्वेविरुद्ध आहे.

भारताला झिम्बाब्वेविरुद्ध मोठ्या विजयासह लक्षणीय रन रेट फरक साध्य करावा लागेल. जर भारताने या सामन्यात प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, तर त्यांना झिम्बाब्वेला कमी



धावसंख्येपर्यंत मर्यादित करावे लागेल आणि लक्ष्य लवकर साध्य करावे लागेल. लक्ष्य जितके लहान असेल तितके लवकर पाठलाग करण्याची आवश्यकता कमी होईल, पण आक्रमक फलंदाजी अजूनही आवश्यक असेल.

जर झिम्बाब्वेने फक्त ९० धावा केल्या, तर भारताला हे लक्ष्य फक्त नऊ षटकांत गाठावे लागेल. इतक्या जलद धावांचा पाठलाग केल्यास नेट रन रेट लक्षणीयरीत्या वाढू शकतो, ज्यामुळे नकारात्मक धावगती सकारात्मक होण्याची शक्यता वाढते, पण जर लक्ष्य १५० धावांपर्यंत पोहचले तर टीम इंडियाला ११ षटकांत जिंकावे लागेल. हेदेखील खूप कठीण असेल, परंतु जर टॉप ऑर्डरने स्फोटक सुरुवात दिली, तर ते शक्य आहे. या परिस्थितीतही भारतीय संघाचा नेट रन रेट नकारात्मकवरून सकारात्मक कडे जाईल. टीम इंडियाने प्रथम फलंदाजी केली तर नेट रन रेट नकारात्मक (-) वरून सकारात्मक (+)वर आणणे थोडे कठीण होईल.

भारताला प्रथम फलंदाजी करताना २२० किंवा २५०+ धावा कराव्या लागतील. जर त्यांनी विरोधी संघाला बाद केले, तर त्यांना अधिक षटके खेळण्याचा फायदा होईल, कारण ऑलआउटिंगमुळे नेट रन रेटमध्ये मोठा वाटा असतो.

**नाणेफेक ठरणार महत्त्वाची**

जर इंडियाला प्रथम गोलंदाजी करायची असेल तर नाणेफेक कोणत्याही परिस्थितीत जिंकावी लागेल आणि जर तसे झाले, तर इंडियाला गोलंदाजी निवडता येईल. समोरच्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, तर भारतासाठी थोडे कठीण होईल, कारण खूप मोठ्या धावांचा डोंगर उभा करावा लागेल.

# मुंबई येथे राज्य क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धा उत्साहात



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र स्टेट पॉवरलिफ्टिंग असोसिएशन व नागरिक सहाय्य केंद्र, वडाळा यांच्या वतीने २१ ते २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राज्य अजिंक्यपद स्पर्धा-२०२६ वरिष्ठ व मास्टर्स पुरुष व महिला गटाच्या निवड चाचणी व राज्य अजिंक्यपद स्पर्धा वडाळा-मुंबई या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेचा उद्‌घाटन समारंभ विविध क्रीडा क्षेत्रातील ८० वर्षांच्या वरील कार्यकर्ते व क्रीडा महर्षी मधुकर तळवलकर, व्यायाम महर्षी संजीवन भास्करन, अर्जुन पुरस्कार विजेते व अध्यक्ष-मरापॉअ, पपी पाटील, व्यायाम महर्षी सुहास पाठारे, संस्थापक पवनपुत्र व्यायाम शाळा चेंबूर, गोपाळ कोळी, क्रिकेट प्रशिक्षक, गजानन वाईरकर, खोखो प्रशिक्षक, विजय परदेशी, संस्थापक आझाद हिंद सर्वोत्कृष्ट मंडळ, मधुकर पाटकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते. डॉ.अर्जुन मुरुडकर व सदानंद चिखले आदींच्या उपस्थितीत झाला. ठाण्याची सुश्मिता देशमुख स्ट्राँग वुमन व सांगलीचा तन्वीर कोतवाल स्ट्राँग मॅनचे मानकरी झाले.

**स्पर्धेचा निकाल वरिष्ठ महिला गट**

४७ किलो-१) अमृता भगत-रायगड, २) देबुश्री सवानल-पुणे ३) सायली सन्नक-रत्नागिरी ५२ किलो-१) सुष्मिता देशमुख-ठाणे २) तन्वी तापडिया-पुणे ३) वैष्णवी चव्हाण मुंबई, ५७ किलो-१) दीप्ती सावंत ठाणे २) संजना ठमके- ठाणे ३) धनश्री पासाळकर पुणे ६३ किलो-:१) सोनाल निवाळकर पुणे २)अनिशा बिर्ला मुं-उ ३)चैत्राली कुलकर्णी पुणे ६९ किलो- १) सारा मुकादम मुंबई उपनगर २) आरती आंबेरकर-सिंधुदुर्ग ३) संजीवनी तांडेल पालघर, ७६ किलो १) सेजल मोईकर पुणे,२) युती धुमकेकर-अहिल्यानगर ३) मेरीन अपेन-ठाणे ८४ किलो १) संहीता मलिक-मुंबई उपनगर २) दीक्षा राऊत-ठाणे ३) स्वप्ना भास्कर-नाशिक ८४+ किलो १) कॅरोलीन पेटसी पुणे २)प्रिया राव-मुंबई उपनगर ३)तन्वी सुर्वे -रत्नागिरी.

**वरिष्ठ पुरुष गट**

५९ किलो १)यज्ञेश कावले मुंबई २)योगेश गुंड मुंबई ३)ग्लेन फर्नांडिस ठाणे,६६ किलो १) गणेश शाहू मुंबई उपनगर २) रोहित देशमुख ठाणे ३) साहिल लांजेकर पुणे, ७४ किलो१)तन्वीर कोतवाल सांगली २) तेजस काकडे -पुणे ३)हेमंत कांबळे -ठाणे ८३ किलो १)राजेश लांजेकर ठाणे २) केतन नेमाडे,जळगाव ३)दीपक शाहू पालघर ९३ किलो १)जितेंद्र राणे मुंबई उपनगर २) अग्नेल नाडर ठाणे ३) संतोष वाघमारे नवी मुंबई १०५ किलो १) अनिकेत कांबळे मुंबई उपनगर २)चैतन्य कोलापे-पुणे ३)डेव्हिड पोतराज ठाणे, १२० किलो १)शिवम ठाकुर पुणे २)आदित्य घरत-नवी मुंबई ३)अभिषेक मूल्या-मुंबई १२०+किलो १)सुनील जैन- ठाणे २) रोहित पवार-पुणे.

स्पर्धे साठी श्री भास्कर सावंत, नागरिक सहाय्य केंद्र, सूर्यकांत गर्दे, संजय माधव, अनंत चाळके, राजहंस मेहंदळे व जितेंद्र यादव आदींनी मार्गदर्शन केले.

# वर्ल्डकप सुपर-८ ग्रुपवर टीका करणाऱ्यांना गावसकरांनी सुनावले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) बनवलेल्या सुपर-८ ग्रुपवरून आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणवर टीका होत आहे. स्पर्धेच्या या टप्प्यावर 'प्री-सीडिंग' मॉडेलवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे अनाकलनीय असल्याचे स्पष्ट करत टीका करणाऱ्यांना सुनील गावसकरांनी सुनावले आहे.

आयसीसीने या स्पर्धेसाठी गटातील कामगिरीऐवजी स्पर्धे पूर्वीच्या मानांकनानुसार सुपर-८ ग्रुप निश्चित केले आहेत. यामुळे एक विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. आपल्या गटात अव्वल ठरलेले चारही संघ (भारत, झिम्बाब्वे, वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिका) एकाच गटात (ग्रुप १) आले आहेत. याउलट दुसऱ्या क्रमांकावर राहिलेले संघ (पाकिस्तान, श्रीलंका, इंग्लंड आणि न्यूझीलंड) दुसऱ्या गटात आहेत.

टीकाकारांच्या मते, हा नियम उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संघांना एक प्रकारे 'शिक्षा' देणारा आहे. प्रभावी संघांना आता एकमेकांशी भिडून स्पर्धेबाहेर व्हावे लागेल, तर दुसऱ्या क्रमांकावरील संघांना उपांत्य फेरीचा मार्ग सोपा झाला आहे.

या वादावर आपली भूमिका मांडताना सुनील गावसकर 'इंडिया टुडे'शी बोलताना म्हणाले, हा मुद्दा आताच का उपस्थित केला जात आहे? स्पर्धेच्या सुरुवातीला हा प्रश्न का विचारला गेला नाही? जे लोक आता ओरड करत आहेत, त्यांनाच हे विचारले पाहिजे.

गावसकर यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या निर्णयांचे समर्थन करताना म्हटलं की, प्रत्येक संघाचा ताफा सारखा नसतो. कोणाला ४० खोल्या लागतात, तर कोणाला कमी. या सर्व तांत्रिक बाबींचा विचार करूनच आयसीसीने प्री-सीडिंगचा निर्णय घेतला असावा.

# इरफान पठाणचा टीम इंडियाला सल्ला

**मुंबई : प्रतिनिधी**

वर्ल्डकप स्पर्धामध्ये भारतीय संघाने सुपर-८ फेरीमधील पहिला सामना गमावला. आता पुढचा सामना गुरुवारी (दि.२६) झिम्बाब्वेविरुद्ध असून त्याआधी माजी खेळाडू इरफान पठाणने टीम इंडियाला एक सल्ला दिला आहे.

सुपर-८ फेरीमधील पहिल्या सामन्यात झालेल्या पराभवामुळे भारतासाठी सेमी फायनलचा रस्ता कठीण झालाय, कारण आता फक्त विजय मिळवून चालणार नाही, तर मोठ्या फरकाने हे विजय मिळवावे लागणार आहेत. नेट रन रेटवर दोन्ही संघांची निवड होईल. या पार्श्वभूमीवर इरफान पठाण म्हणाला, कुलदीप यादव आणि संजू सॅमसन यांना संघात घेणे लालचीपण केल्यासारखे होईल, भारताने फक्त अक्षर पटेलला टीममध्ये घेतले पाहिजे, कारण तो डावखुऱ्या फलंदाजांनाही गोलंदाजी करू शकतो. त्याच्याकडे अनुभव असून फलंदाजीमध्येही त्याचा उपयोग होऊ शकतो.

टीम मॅनेजमेंट कुलदीपला घेण्याचा विचार करू शकते, कारण वेस्ट इंडिजची आक्रमक फलंदाजी पाहिली आहे. त्यामुळे त्याला झिम्बाब्वेविरुद्ध संधी देत पाहू शकतात. संजू सॅमसनबाबतीत विचार करत असतील, पण मला वाटते की, भारतीय संघाने जास्तीचे बदल न करत फक्त एकच करावा आणि तो अक्षर पटेल याला संघात जागा मिळायला पाहिजे, असे ही इरफानने म्हटलले आहे.

## रिचर्ड पायबस प्रशिक्षकपदी

**काबूल :** टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत अफगाणिस्तानला साखळी गाशा फेरीतच गुंडाळावा लागला. यासह मुख्य प्रशिक्षक जोनाथन ट्रॉट यांचा कार्यकाळही संपला. त्यानतंर अफगाणिस्तानने रिचर्ड पायबस यांची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

६१ वर्षीय पायबस यांची आंतरराष्ट्रीय पातळीवर एक प्रतिष्ठित प्रशिक्षक म्हणून कारकिर्द आहे. त्यांनी यापूर्वी पाकिस्तान आणि वेस्ट इंडिजच्या प्रशिक्षकपदाची भूमिका बजावली आहे. पुढच्या महिन्यात अफगाणिस्तान आणि श्रीलंका यांच्यात व्हाईट बॉल क्रिकेट मालिका सुरू होईल, त्या आधीच पायबस हे अफगाणिस्तान संघासोबत काम करण्यास सुरूवात करतील. पायबस यांचा प्रशिक्षकपदाचा कार्यकाळ जबरदस्त राहिला आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com